
श्री वैद्यनाथ शिवसांप्रदायीक भजनी मालिका


(छबीना पद्धती, शिवपाठ, संक्षिप्त लिंगपुजा विधी)



श्री वैद्यनाथ प्रभु, श्री क्षेत्र, परळी वैद्यनाथ.







किंमत रु. ३१/-

श्री वैद्यनाथ शिव सांप्रदाय छबीना भजन

शिवपाठ (संत शिवदासकृत)
श्री वैद्यनाथ स्तोत्र
श्री वैद्यनाथ अष्टक
श्री संत गुरुलिंगस्वामींचे अभंग
शिव शरणाष्टक
लिंगाष्टक
शिवमानसपुजा स्तोत्र
संक्षिप्त शिवपुजा विधी
शिवपंचाक्षर स्तोत्र
श्री शिवस्तुती
नित्यपाठाच्या बेचाळीस ओव्या
आरती लिंगाची - आरती भिमाशंकराची
आरती पलसिद्धाची व इतर आरत्या
श्री संत शिरोमणी मन्मथस्वामी स्तोत्र

संकलक/प्रकाशक
श्री नागनाथ वाघमारे,
परळी वैजनाथ.जि.बीड

प्रकाशन दिनांक
माघ शु.१३, शके १९३७
महाशिवरात्री
दि.०७/०३/२०१६

किंमत रु. ३१/-

प्रस्तावना

श्रीक्षेत्र परळी वैजनाथ हे भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग स्थान आहे. या श्री वैद्यनाथ मंदिरात दर सोमवारी शिवभजन रात्री साडे नऊ ते दीड वाजे पर्यंत छबीना भजन आरती अनेक वर्षापासून चालू आहे. त्या वेळी श्री वैद्यनाथ प्रभूची पालखी मंदिरातल्या मंदिरात निघत असते. त्यावेळी अनेक संताची भजने शिवभक्त म्हणतात. हा आनंद अवर्णनीय आहे. भाग्यशाली अनेक माय-बहिणी व पुरुष हा आनंद प्रत्येक सोमवारी लुटीत असतात. हा सोहळा भव्य मनोहर आहे. त्यातील निवडक भजने, श्री वैद्यनाथपर व इतर कांही संताची भजने शिवभक्त नागनाथअप्पा वाघमारे रा.परळी वैजनाथ यांनी संकलन करुन छापले आहे. शिवभक्त प्रेमी भक्त गणांनी या अनमोल भजनाचा आनंद घेण्यासाठी एकतरी भजन मालिका संग्रही ठेवावी. श्री नागनाथअप्पा वाघमारे हे अभिनंदास पात्र आहेत. त्यांचे हे परिश्रम सफल होवो, हीच श्री वैद्यनाथ चरणी अनन्य प्रार्थना

– संत चरणरज

महारुद्र महाराज श्री गुरु तुळशीराम प्रभू

रा. अंबेवेस, परळी वैजनाथ जि. बीड

मोह भंजक भजनांचे संकलक – भक्त नागनाथ वाघमारे

एके दिवशी सायंकाळी प्रभू वैद्यनाथाचे निस्सीम भक्त आदरणीय श्री नागनाथ (नागूदेव) वाघमारे यांची व माझी योगायोगाने भेट झाली.या भेटीत त्यांनी मला आपल्या श्री वैद्यनाथ शिवसंप्रदाय भजन (छबीना भजन) या संकलनपर पुस्तकासाठी चार ओळीचीं प्रस्तावना लिहीण्याची विनंती केली. ही प्रस्तावना लिहीणे माझ्यासाठी फार मोठी भाग्याची गोष्ट आहे.

दुसऱ्या दिवशी त्यांनी दिलेले पुस्तक पान न पान चाळले. ते अनेक भजनांचे संकलन होते. जप व पुजन यांचे स्वरुप व्यक्तीगत असते. भजनाचे स्वरुप सामुदायिक व सामुहीक असते. त्या भजनांचे त्यांनी केलेले संकलन औचित्यपूर्ण व आदर्श आहे. जातांना त्यांनी ते कागदाचे चिठोरे मला दिले. चिठोरे माझ्या स्वाधिन करण्यामागे त्यांची सुचकता माझ्या किंचित उशीरा लक्षात आली. त्यात त्यांचे दोन हेतू दडलेले असावेत असे मला वाटते. कागदाची सुध्दा झळ मला लागू नये व अधिक पाल्हाळ मी लावू नये. पण मला हे कसे शक्य ? डेराभर दही घुसळून वाटीभर लोणी काढणारा मी. नीत नवे नवनीत देणाऱ्या भक्तांबद्दल माझ्यासारखा अभक्त काय सांगणार ? "आपणासारखे करिती तात्काळ । नाही काळवेळ तया लागी " असे यांचे सामर्थ्य.

दुःखाचे मूळ मोह. अशा मोहांचे भंजन करण्याची शक्ती भक्तीभावाने करण्यात येणाऱ्या भजनात आहे. अशा भजनांचे संकलन असलेले हे पुस्तक. आदरणीय नागूदेव वाघमारे हे कर्मातचि तुझा भाग, तो फळात नसो कधी असे निष्काम कर्मयोगी व कर्मे ईशू भजावा असे भक्त त्यांना माझे विनम्र वंदन.

भक्तांचा भक्त

राजेश्वर शिवाजी देशमुख

(विश्वस्त, श्री वैद्यनाथ देवल कमीटी, परळी वैजनाथ)

श्री वैद्यनाथ प्रसन्न

स्तवन

ॐ ब्रह्मानंन्दं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्ति

द्वंद्वातितं गगन सद्दश्यं तत्व मत्स्यादिलक्षम्

एकं नित्यं विमल मचलं सर्वधीः साक्षिभूतं

भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरु तं नमामि

कांतीपुरी नगरी पुण्यभूमी पवित्र ।

तेथे राहातो श्री वैद्यनाथ सुपात्र ।।

तया आठविता घडे महापुण्य राशी ।

नमस्कार माझा श्री वैद्यनाथ प्रभुशी ।।

सांब जय नमः पार्वतीपते शिव हर हर महादेव

श्री वैद्यनाथ भगवान की जय

संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराजकी जय

श्री मद् जगद्गुरु पंचाचार्य महाराजकी जय

भजन

जय जय गुरु महाराज गुरु ।

जय जय परब्रह्म सद्गुरु ।।

अभंग

प्रमथ गणाचिया मेळी । चंद्रमौळी देखियेला ।।१।।

भस्म शोभे सर्व अंगी । वामभागी भवानी ।।२।।

शोभे पन्नग भूषण । नंदी वाहन साजिरें ।।३।।

संगे तापसांचे भार । रमावर विरंची ।।४।।

छत्र चामरें उभविती । गीत गाती बडिवार ।।५।।

ऐसा पाहुनिया डोळा । सुख सोहळा सुखाचा ।।६।।

मन्मथ घाली लोटांगण । कवळी चरण आवडी ।।७।।

अभंग

माते शारदे सुंदरी । ब्रह्मप्रिये कृपा करी ।।१।।

शिवगुण गे वदवी । महामाय बुद्धी द्यावी ।।२।।

कृपा कटाक्ष पाहासी । त्यासी मुक्त तु करीसी ।।३।।

योगीयाचे समाधान । नोहे तुझे कृपेवीण ।।४।।

लक्ष्मण म्हणे माय । वेगी करी माझी सोय ।।५।।

भजन

जय जय शंकर उमाई । जय जय शंकर उमाई ।

अभंग गुरुचा

धन्य धन्य गुरुमाय । आज देखीयेले पाय ॥१॥

तुज पाहता माऊली । पाप ताप दैन्य गेले ॥२॥

तुझ्या वचन अमृते । झालो मी पुर्ण तृप्त ॥३॥

शिवदास म्हणे दाता । नाहीं सम गुरुनाथा ॥४॥

अभंग

तुज पाहता वैद्यनाथा । हरपली सर्व चिंता ॥१॥

झाले जन्माचे सार्थक । निवारीले द्वंद्व दुःख ॥२॥

पूर्व संचिताचा ठेवा । तेणे तुझी भेटी देवा ॥३॥

चन्ना म्हणे तुझ्या पायी । आता ठाव दे अक्षयी ॥४॥

अभंग वैद्यनाथाचा

वैद्यनाथाच्या दर्शनी । पाप ताप गेले दोन्ही ॥१॥

ऐसे जयाचे महिमान । स्मरुं जाता नुरे भिन्न ॥२॥

करिता त्याची पुजा ध्यान । वृत्ती होय समाधान ॥३॥

चन्ना म्हणे वैद्यनाथ । मज केले देहातीत ॥४॥

अभंग

तुज करणे आहे हित । तरी तूं स्मरी वैद्यनाथ ॥१॥

तेणे सर्व सुखीं होसी । भव दुःख विसरसी ॥२॥

ध्यानी मनी सदोदित । गाई ध्याई वैद्यनाथ ॥३॥

चन्ना म्हणे वैद्यनाथ । पुरवी सर्व मनोरथ ॥४॥

अभंग

वैद्यनाथ ज्योर्तिलिंग । करिसी भक्तासी निःसंग ।।१।।

आदि अंती विश्वामधी । वसशी तु कृपा निधी ।।२।।

अनंत ब्रह्मांड आधार । तुझा आहे हा निर्धार ।।३।।

लक्ष्मण म्हणे सिध्द । तुम्हा स्तवीतीं ब्रह्मानंद ।।४।।

अभंग

धन्य क्षेत्र हे परळी । जेथे नांदे चंद्रमौळी ।।१।।

धन्य तेथीचे हे जन । सदा गाती शिवगुण ।।२।।

कोणी करिती अध्यायन । कोणी करिती अध्यापन ।।३।।

कोणी करिती तीर्थ स्नान । कोणी करिती गुप्तदान ।।४।।

कोणी मेरु प्रदक्षिणा । कोणी करिती ध्यान धारणा ।।५।।

चन्ना म्हणे सुकृत बळ । म्हणुनी पाहिले हे स्थळ ।।६।।

अभंग शिवरात्रीचा

शिवरात्री पर्व थोर । सर्व पर्वाचे आगर ।।१।।

आज दिवस सोनियाचा । झाला उदय भाग्याचा ।।२।।

अहर्निशी नाम घोष । होतो अंतरी उल्हास ।।३।।

म्हणे महादेव सुख । देतो दासा पंचमुख ।।४।।

अभंग

नाही मज ज्ञान नेणो गा साधन । करितो भजन भोळ्या भावे ।।१।।
नाही अंगी शक्ती करू तीर्थाटन । करितो पुजन भोळ्या भावे. ।।२।।
न कळे चातुर्य करावया स्तुती । अल्प माझी मती उमारमण ।।३।।
मन्मथ शिवलिंग म्हणे देवराया । विनवितो पाया भोळ्या भावे ।।४।।

आरती

शिवद्वारी उभी संतांची मंडळी । ती माझी दिवाळी आनंदाची ।।१।।
काया कनक ताटी पंचप्राण ज्योति । ओवाळु पशुपती मनोभावे ।।२।।
ओवाळीन दोघा पार्वती शंकरा । उचित दातारा हेचि द्यावे ।।३।।
लिंगेश्वर म्हणे हेची मज द्यावे । अहर्निशी घ्यावे नाम तुझे ।।४।।
जय जय सद्गुरू । स्वामी मन्मथ महाराजा ।
तारक तु सकळांचा । जीव लग सोयरा ।
काया कनक ताटी पंचप्राण ज्योती ।ओवाळु पशुपती मनोभावे ।
जय जय सद्गुरू स्वामी । मन्मथ महाराजा

आरती श्री गणपतीची

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची । कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।१।।
जय देव जय देव जय मंगलमुर्ति । दर्शनमात्र मनः कामना पुरती ।।धृ.।।
रत्नखचित हरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुम केशरा ।।
हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रूणझुणती नुपूरे चरणी घागरिया ।।२।।
लंबोदर पितांबर फणिवर वंदना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना ।।३।।

आरती श्री वैद्यनाथजीची

आरती वैद्यनाथजीची । विश्वंभर उमापतीची ।।धृ।।

सर्व घटपटांतरी भरला । भरोनि तो दशांगुली उरला।।

शरण जे जाती चरणकमला । हृदयी कवटाळुनि धरी त्याला ।।

जीव शिव ऐक्य आनंदाला । स्वईच्छित पद दे दासाला ।।

(चा) ऐसा जाणुनि बडीवार । विष्णू ब्रह्मादि थोर थोर ।।

सनकादिक ऋषिश्वर ।

(चा.) येऊन कैलासी, प्रदोष समयासी, करी नृत्यासी ।

हरिहराची पाहे उमा शक्ती त्याची ।।१।।

भस्मोधुलीत सर्वांगा । क्रोधे मर्दूनिया नंगा ।।

मस्तकी धरलीसे गंगा । भुषण केले भुजंगा ।।

हातामध्ये धरूनि त्रिशुलखड्गा । आवरण केले मार्तंडा ।

(चा) गळ्यामध्ये रुंडमाळ शोभती । वाद्ये शंख डमरू वाजती ।।

सुरवर हर हर हर स्तविती ।

(चा.) आसनी झाला मृगेंद्र, भाळी शोभे चंद्र, जोडोनि कर इंद्र,

ईच्छितोची, आशा पुरवी वांच्छितांची ।।२।।

मुख्य स्थळ कैलासीचे । विरंची ध्यान करी त्याचे ।

अनेक ऋषिगण गंधर्वांचे । पुजी एक दैवत शंभुचे ।

भू-कैलास म्हणती कलीचे । संमत परळी महात्म्याचे ।।

(चा.) कृत त्रेता द्वापारादि कली । कांतीपुरी नाम क्षेत्र परळी ।

स्मरता त्रिविध ताप जाळी । (चा.) पृष्ठी नगहरी । वामांगी गौरी ।

गोधूम गिरीवरी । ऐंसी मूर्ति शंकराची । वंदे नारायण पद त्याचे ।।३।।

आरती देवी पार्वतीची

दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी ।
अनाथनाथे अंबे करूणा विस्तारी ।।
वारी वारी जन्म मरणाते वारी ।
हारी पडलो आता संकट निवारी ।।१।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी ।
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी ।।धृ.।।
त्रिभुवन भुवनी पाहता तुज ऐसी नाही ।
चारी श्रमले परंतु न बोलवे कांही ।।
साही विवाद करिता पडिले प्रवाही ।
ते तु भक्तां लागी पावसी लवलाही ।।२।।
प्रसन्न वदने प्रसन्न होशी निजदासा ।
क्लेशापासुनी सोडी तोडी भवपाशा ।।
अंबे तुजवाचून कोण पुरविल आशा ।
नरहरी तल्लिन झाला पदपंकज लेशा ।।३।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी ।
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी ।।धृ.।।
सांब जय नमः पार्वती पते शिव हर हर महादेव ।
वैद्यनाथ भगवान की जय ।।
संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराजकी जय

अभंग

काशी काशी हा उच्चार । ज्यांचे वदनी निरंतर ।।१।।

त्याच्या पुण्या नाही सीमा । द्यावी कोठील उपमा ।।२।।

अविनाश महाक्षेत्र । तेथे नांदे तो त्रिनेत्र ।।३।।

महादेव म्हणे लाभ । देतो पार्वती वल्लभ ।।४।।

आरती गौरी शंकराची

सांब सदाशिवहरा कर्पूरगौरा ।
आरती ओवाळीतो गौरी शंकरा ।।धृ.।।
एकेवीस स्वर्ग उंच त्याहुनि तो वरता ।
जटा मुकूटी गंगा ठेउनिया माथा ।।
भाळी शोभे चंद्र पन्नग खेळता ।।१।।
सांबसदाशिवहरा कर्पूरगौरा ।
आरती ओवाळीतो गौरी शंकरा ।।धृ.।।
दत्त दिगंबर भोळा त्रिनेत्री ज्वाळा ।
अर्धांगी पार्वती व्याघ्रांबर सोहळा ।।
भस्म चर्चुंन अंगी रूद्राक्ष गळा ।
चंदन बिल्व पत्र पुष्पांच्या माळा ।।२।।
सांबसदाशिवहरा कर्पुर गौरा ।
आरती ओवाळीतो गौरीशंकरा ।।धृ.।।
देव दैत्याने सागर मंथन केले ।
चौदा रत्नांमध्ये विष प्रगटले ।।
ब्रह्मांड दग्ध होता आसू प्राशिले ।
नीळकंठ नाम प्रसिध्द झाले ।।३।।

दशभुज पंचवदन मदनांतककारी ।
शत कोटींचे बीज वाचे उच्चारी ।।
शिवदास म्हणे जन्म मरण निवारी ।
साधु संत योगी ध्याती अंतरी ।। ४ ।।

ठेपा पहिला

तुझे नाम रे घेऊनी । ऊभा राहिलो कीर्तनी ।।१।।
काही नाही पाठांतर । केवळ अन्यायी पामर ।।२।।
भाव नाही भक्ती नाही । दया नाही क्षमा नाही ।।३।।
विषयी झालो रे लंपट । सदा सर्वदा खटपट ।।४।।
तुझ्या नावे केले सोंग । देवराया भरी रंग ।।५।।
लक्ष्मण म्हणे देवा । भेट द्यावी सदाशिवा ।।६।।

ठेपा दुसरा

अहो वैद्यनाथा किती अंत पहासी । मज पतितासी तारी देवा ।।१।।
तुजविण मज कोण आहे येथे । सांगा पशुपते मायबापा ।।२।।
त्रिविध हे ताप पीडिती अपार । सुख क्षणभर नाही मज ।।३।।
चन्ना म्हणे मी तों चाललोसे वाया । तारी शंभोराया दीनबंधु ।।४।।

अभंग

वैद्यनाथ तुज करितो विनंती । सर्वकाळ चित्ती राहो माझ्या ।।१।।
तरीच संसार होईल सुफळ । जाईल तळमळ अंतरीची ।।२।।
वाचे नाम अमृत मनी प्रेमभाव । दृष्टीशी वैभव रूप तुझे ।।३।।
चन्ना म्हणे माझे पुरवी मनोरथ । मग मी स्वानंदात राहे सदा ।।४।।

अभंग

वैद्यनाथ तु दयाळुं । असशी भक्तांचा कनवाळु ।।१।।
म्हणुनी शरण आलो तुज । देवा राखी माझी लाज ।।२।।
तुजवीण मज कोणी । दुजा नाही या त्रिभुवनी ।।३।।
चन्ना म्हणे विश्वंभरा । वेगी देई मज थारा ।।४।।

अभंग

तुज पाहता दृष्टीपुढे । सर्व विसरलो कोडे ।।१।।
तुझे पायी ठेवी माथा । निवारीली सर्व चिंता ।।२।।
ध्यानी तुझा निज ध्यास । शांती पावलो चित्तास ।।३।।
चन्ना म्हणे वैद्यनाथ । मज केले आनंदात ।।४।।

ठेपा तिसरा-अभंग शिखराचा

मध्य मेरूच्या शिखरी । देव नांदे त्रिपुरारी ।।१।।
निजभक्तां साह्यकारी । तोची आमुचा कैवारी ।।२।।
चला जाऊ तया ठाया । प्रेमे आळवु शंभुराया ।।३।।
ठेवू मस्तक हे पाया । करिल दया आम्हाते ।।४।।
टाळ मृदंग वीणा नाद । गाऊ नाचुया स्वच्छंद ।।५।।
करु ब्रह्मी ब्रह्मानंद । चन्ना आनंदी आनंद ।।६।।

अभंग

बांधुनिया घर मेरूच्या शिखरी । राहतोस अंतरी वैद्यनाथा ।।१।।
तरी तुझे तुज गोड वाटे देवा । आम्हा वीरशैवा भक्तालागी ।।२।।
ईष्ट प्राण भाव सर्व तु आम्हासी । येथे एकदेशी कशासाठी ।।३।।
चन्ना म्हणे तुची पुर्ण सर्वाठायी । तुजवीण नाही ठाव रिता ।।४।।

ठेपा चौथा

येई देवा वैद्यनाथ परळीच्या राया ।
जगी माझा जन्म व्यर्थ जातो वाया ।।१।।
देवा तुज विसरोनी झालो संसारी ।
परी सुख नाही क्षण सोसवेना दुःख ।।२।।
काम क्रोध शोक आणि मोह लाज भय ।
निशी दिन कांही सुचेना उपाय ।।३।।
चन्ना म्हणें येई देवा न लावी उशीर ।
दुःख अंती सोसवेना मी त्रासलो फार ।।४।।

अभंग

पुर्व सुकृताचे फळ । आज पावलो सकळ ।।१।।
पाहीला वैद्यनाथ दृष्टी । आनंद न समाये पोटी ।।२।।
ठेवी मस्तक हे पायी । आता झालो निर्भयी ।।३।।
चन्ना म्हणे ज्योर्तिलिंग । पाहाता झालो भवभंग ।।४।।

अभंग

धन्य परळी क्षेत्र धन्य वैद्यनाथ । धन्य शिवभक्त भाविक ते ।।१।।
धन्य त्यांचा भाव धन्य त्यांची भक्ती । धन्य ज्यांचे चित्ती सदाशिव ।।२।।
धन्य त्यांचे व्रत एक वैद्यनाथ । अनेकाची मात नायकतीं ।।३।।
चन्ना म्हणे धन्य त्याची खरी निष्ठा । एका नीळकंठा आळवितीं ।।४।।

ठेपा पाचवा-अभंग

जय जय माय जगदंबे । सर्वाआदी मुळारंभे ॥१॥

तुच जगत्रय जननी । मुळ ॐकार रूपिणी ॥२॥

उभारूनी सृष्टी सारीं । नटली तुं सर्वापरी ॥३॥

चन्ना म्हणे जगन्माता । तुझ्या कृपे भेटे ताता ॥४॥

अभंग

माय माझी शिवाबाई । कोठे गुंतलिसे आई ॥१॥

तुजवीण परदेशी । भवारण्य वनवासी ॥२॥

येता मातेसी कंटाळा । तेथे कोण राखी बाळा ॥३॥

चन्ना तान्हुले लेकरू । माते नको दुर करू ॥४॥

अभंग

धन्य आज दिन भला । आम्हा थोर लाभ झाला ॥१॥

बहुत सुकृतांच्या गाठी । तेणे झाल्या संत भेटी ॥२॥

मिळे पुर्वजांचा ठेवा । किंवा बालकार्शी मेवा ॥३॥

शिवदास देखियेले । शिवयोग्याची पाऊलें ॥४॥

उत्तर अभंग संताचा

माझ्या मना लागो चाळा । पहावया संत डोळा ॥१॥

आणिक नाही मज चाड । न लगे संसार धड गोड ॥२॥

तरीच फळ जन्मा आलो । उमारंगी धन्य झालों ॥३॥

मन्मथ म्हणे महादेवा । देई सज्जनाची सेवा ॥४॥

भजन - गुरुराज माऊली । गुरुराज माऊली ॥

अभंग मागणे

तुजलागी हेचि मागो । तुझे नामी छंद लागो ॥१॥

सुखे संसारासी घाली । देई आवडी पाऊलीं ॥२॥

नको नीचांचा सहवास । नको साधुजनी त्रास ॥३॥

मोह पुत्र कलत्रांचा । नको लोभ शरीराचा ॥४॥

नको लोकांती एकांती । नको परनारी संगती ॥५॥

म्हणे मन्मथ शिवलिंगा । देई चरणापासी जागा ॥६॥

अभंग

अवघ्या शकुनाचा शकुन । झाले दर्शन संतांचे ॥२॥

पाप ताप दैन्य नासे । सुखा फुटे हो दोंदले ॥२॥

होय जन्माचे सार्थक । एकाएकी समसाम्य ॥३॥

मन्मथ म्हणे फळा आले । मागील केले सुकृत ॥४॥

अभंग स्मरण

स्मरण करा हो मनी भाव धरा हो ।

संसार सागर भक्ती बळे तरा हो ॥१॥

अभ्रांची साउली तैसी संपदा भुली ।

साच नोव्हे वश करा गुरुमाउली ॥२॥

विषय मदा हो काय भुलाल सदा हो ।

टाळी वाजवुनी मुखी शिव वदा हो ॥३॥

बसवलिंग हेची तुम्हां हित सांगतो ।

सर्व जगी ब्रह्म व्हावे हेच मागतो ॥४॥

बारा ज्योतिर्लिंग अष्टक

ज्योतिर्लिंग आदि दैवत । आधी स्मरा विश्वनाथ ।।१।।
ओंकार ममलेश्वर । पुढे पहा हिमकेदार ।।२।।
सोमनाथ तो सोरटी । महांकालेश्वर उत्तर तटी ।।३।।
भीमाशंकर त्रिंबकराज । पहा घृष्णेश्वराचे तेज ।।४।।
रामनाथाचे दर्शन । श्री शैल्य मल्लिकार्जून ।।५।।
कांती नगरी वैद्यनाथ । नाग भूषण नागनाथ ।।६।।
म्हणे मन्मथ शिवलिंग । नमस्कार व्दादश लिंगा ।।७।।

आरती मन्मथस्वामीची

आरती शिवराजा । मन्मथस्वामी महाराजा ।
वेदांताचे सार । मुख्य पेरिले बीज ।।धृ.।।
समाधी महास्थळी । सर्प व्याघ्रांची जाळी ।
निर्वैर श्वापदे हो । समदृष्टीने न्याहाळी ।।१।।
शिवभक्ति लोप झाली । विश्व शिवमय केले ।
ग्रंथ हा परमरहस्य । गुह्य प्रगट केले ।।२।।
अभंगी निरूपण । अनुभवीले ज्ञान ।
आनंद शिवदासा । सर्व शुभ कल्याण ।।३।।

आरती कापूराची

जय जय कर्पूर गौरा तारी जय जय कर्पूर गौरा ।।धृ.।।
भस्म चर्चित नील गळांबर । झळाळीती रूंडमाळा ।
इंदू लल्लाटी शेष असे कंठी । गजचर्म व्याघ्रांबरा हो ।।१।।
सिंहासनी महाराज विराजीत । अंकी वसे सुंदरा हो ।
भक्त दयाकर वंदीती निर्जर । धन्य तु निलअवतारा हो ।।२।।

मती मंद हीन झालो पदी लीन । पार करी संसारा ।
काशी सुतात्मज मागतसे गुज । दे चरणी मज थारा हो ।।३।।

भजन- सुखाची विनवणी

सुखी असो ही मंडळी । जे का ध्याती चंद्रमौळी ।।१।।
काम क्रोधाचा ओळसा । न हो माझ्या शिवदासा ।।२।।
अहंकार हा दुस्तर । याचा पडो द्या विसर ।।३।।
व्हावे चिरंजीव सर्व । ज्याचे चित्ती माझा शिव ।।४।।
शिवदास म्हणे त्याचे । व्हावे कल्याण त्रिवाचे ।।५।।

अभंग- नमस्काराचा

नमस्कार माझा श्रोते लहान थोरा । नारी आणि नरा सर्व याती ।।१।।
सांडोनि आळस लाज अभिमान । करावे भजन प्रेमानंदे ।।२।।
शिवहर शब्दाची करोनि आरोळी । लावावी देऊळी दाद माझी ।।३।।
अशक्त मी आहे दुर्बळ सर्वथा । म्हणोनिया माथा श्रोत्यांपायी ।।४।।
शिवदास म्हणे सकळ मिळोनि । ध्यावे शिवचरणी लोटोनिया ।।५।।

भजन

जय शंकर जय शिव शंकर
जय शंकर जय शिव शंकर

मंत्र पुष्पांजली - बेल वाहाणे

हर ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवा स्तानि धर्माणि प्रथमान्यासन्
तेहनाकंमहिमान सचंत यंत्र पूर्वे साध्यः संति देवाः
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महें
समे कामान् काम कामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातू
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः हरॐ स्वस्ति साम्राज्य भौज्यं
स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठयं, राज्यं
महाराजमाधिपत्यमयं समंतपर्याईस्यात् सर्व भौमः
सार्वायुष आंतादा परार्धात पृथिव्यै समुद्रपर्यंतायाः
एकराळिती तद्प्येष श्लोकोभिगीतो मरूतः परिवेष्टारों
मरूतस्याऽवसन् गृहे आविक्षितस्य कामप्रिये विश्वेदेवाः
सभासद इति

ॐ तत्पुरूषाय विद्महे । महादेवाय धीमहि तन्नो रूद्रः प्रचोदयात ॥

अभंग विनवणी

जय जय मदनांतका । सर्वव्यापका सर्वेशा ।
उमापती गंगाधरा । चंद्रशेखरा सांब मुर्ति ॥ १ ॥
पशुपती परशुधरा । परात्परा परपुरूषा ।
सदाशिवा शुळपाणी । भाळनयनी त्रिलोचना ॥ २ ॥
भक्तवत्सला भयनाशका । भवभंजका त्रिपुरारी ।
नीलकंठा शशिशेखरा । गौरीवरा गणानाथा ॥ ३ ॥
महादेवा महाराजा । नंदीध्वजा तुज नमो ।
हर रे मन्मथाची वाणी । नामस्मरणी ठेवावी ॥ ४ ॥

भजन

न पडो विसर तुझीये पायाचा । गीती गाऊ वाचा नाम तुझे ।।१।।

तुझीये सेवेचा नसावा वियोग । ईच्छितो सुयोग जन्मोजन्मी ।।२ ।।

मज दुर्बळासी इतुकेचि देई । विनवितो डोई ठेवूनिया पाया ।।३।।

हेचि देई देवा न मागो आणिक । स्वामी मी सेवक तू हे करी ।। ४ ।।

त्रैलोक्याचा स्वामी दाता तू ऊदार । मागणे तुज फार मोक्षपद ।। ५ ।।

कृपाळु होऊनी मन्मथा अपंगी । महाराज योगीयाचे निजा ।। ६ ।।

भेटीचा अभंग

दे मला वैद्यनाथा कृपा करी दीनावरी आता । भेट दे मला ।।१।।

दे मला नीलकंठा कंठ शोषला हांका देता । भेट दे मला ।।२।।

दे मला पशुपती किती मी येऊ काकुलती । भेट दे मला ।।३।।

दे मला भस्मधारी तुजवीण कोण आम्हां तारी । भेट दे मला ।।४।।

दे मला चंद्रचुडा तुजवीण जीव झाला वेडा । भेट दे मला ।।५।।

दे मला मृत्युंजया मृडानीवरा शंभोराया । भेट दे मला ।।६।।

दे मला काशीवेशा लागली बहुत तुझी आशा । भेट दे मला ।।७।।

अभंग प्रार्थनेचा

भोळ्या शंकरा शंकरा । देवा पार्वतीच्या वरा ।।१।।

माझी ऐकावी प्रार्थना । बहुत पावलो यातना ।।२।।

आता नको गर्भवास । फार झालो कासावीस ।।३।।

तोडी संसार बंधन । चरणी लावी अंतःकरण ।।४।।

मन्मथासी सोडवी आता । विश्वलोचनी अनंता ।।५।।

भजन

शंभो रे हर शंभो रे हर शंभो रे हर ।

मन्मथ स्वामीकृत प्रसाद

जे शब्द सृष्टीचे ईश्वर । सबराभरीत अगोचर ।
निर्लेप मंगल साचार । परम वंद्य जे ।।१।।
नमू तया परमेश्वरा । जगद्रुपा जगदाधारा ।
जगन्निर्मात्या महेश्वरा । सच्चिदरुपा जी ।।२।।
जो मी वाग्यज्ञ आरंभिला । तो हा तुम्ही पूर्ण केला ।
कृपा करोनि पाहिजे दिधला । आशीर्वाद हा ।।३।।
जे दुष्ट दुर्जन अमंगळ । त्यांची ऱ्हदये होवोत निर्मळ ।
कलिकाळ सकळ । निरसोनि जाय ।।४।।
जे जे दिसे दृष्टी पुढे । ते अवघे शिवरुप गाढे ।
ऐसिया संतांची हुडे । निर्भय हिंडो ।।५।।
सर्व सुखांचा हो सुकाळ । दुःख दारिद्रय छळ ।
नष्ट होवो सकळ । मनोमालिन्य ही ।।६।।
जे का शिवभक्त जन । त्यांच्या दर्शने पावन ।
सकळ सृष्टीचे जीवन । होतु आनंदे ।।७।।
या माझ्या जगती तळी । सर्वत्र संचरो भक्त मंडळी ।
शिवभक्तीची नव्हाळी । नित्य लाभो जगा ।।८।।
जे जे अमंगळ या भुवनी । ते ते लोपो शूळपाणी ।
सुमंगळ भाव या जनी । उपजो सदा ।।९।।
वाढो लोकी सदाचार । सद्विद्येचा भडिमार ।
होवो सर्वत्र साचार । हाचि प्रसाद आवडे ।।१०।।
आणिकहि ऐसे करावे । सुखाचे मळे पिकवावे ।
आमुलाग्र नासून जावे । विघ्नबाधा ।।११।।
ही माझी वाक् पुष्प पूजा । समर्पण होवो श्री गुरुराजा ।
मन्मथ शिवलिंग विनवी ओजा । श्रीगुरु नागेशासी ।।१२।।

अभंग प्रसादाचा

गुरु प्रसादाची थोरी । महिमा असे श्रेष्ठ भारी ।।१।।

प्रसाद घेताची स्वामीचा । नाश होय षड्रिपूंचा ।।२।।

मी-तू पणा हा नुरे रे । सुख अक्षयी घेई रे ।। ३।।

सुख ब्रह्मानंद होय । गगनी आनंद न माय ।। ४।।

लक्ष्मण म्हणे घ्या हो । जन्म मृत्यु चुकवा हो ।। ५।।

भजन

महादेव शिवशंकर शंभो, उमाकांत हर त्रिपूरारे ।

मृत्युंजय वृषभोध्वज शुलिन, गंगाधर मृडमदनारे ।।

पूर्णा आहुती

ॐ पूर्ण मदः पूर्णमिदं । पूर्णात्पूर्ण मुदच्यते ।

पूर्णस्य पूर्ण मादाय । पूर्ण मेवाव शिष्यते ।

ॐ शांतिः शांतिः शांतिः

सांब जय नमः पार्वतीपते शिवहरहर महादेव

श्री वैद्यनाथ भगवान की जय

श्री संत शिरोमणी मन्मथस्वामी महाराज की जय

श्री भवानी माता की जय

श्रीमद् जगद्गुरु पंचाचार्य महाराज की जय

(विभाग दुसरा)

शिवपाठ प्रारंभ

जय जय गुरु महाराज गुरु ।

जय जय परब्रह्म सद्‌गुरु ।।

अभंग

शिवसुता गणपती । चौदा विद्येचा सारथी ।। १ ।।
करी कृपा लंबोदर । गजमुंड निर्विकार ।। २ ।।
वेद भुजांगी सेंदुर । वाहन मूषक सुंदर ।। ३ ।।
फरशू अंकुश घेऊनि हाती । तेणे नाना विघ्ने जाती ।।४ ।।
तुझे नाम विघ्नहर । करिशी विघ्नांचा संहार ।। ५ ।।
म्हणे मन्मथ शिवलिंग । गण तोचि उमारंग ।।६ ।।

अभंग

रुप सगुण सुंदर । नाम शोभे श्री शंकर ।।१ ।।
माझे हृदय भुवन । करा आपुले सिंहासन ।।२ ।।
इतुके द्यावे मज आता । दीनबंधु विश्वनाथा ।।३ ।।
म्हणे महादेव किंकर । जवळी राहे निरंतर ।।४ ।।

भजन

जय जय शंकर उमाई । जय जय शंकर उमाई ।।

अभंग

गुरुदेव सार गुरुदेव थोर । आदि अगोचर परब्रह्म ।। १ ।।
वेदश्रुति शास्त्रे गर्जती पुराणे । न कळे महिमान ब्रह्मादिका ।। २ ।।
रवि शशी ऋषी सर्व तारांगण । करीती प्रदक्षिणा अहर्निशी ।। ३ ।।
मन्मथ म्हणे गुरु परब्रह्म मूर्ती । त्रिभुवनी वंदिती सुरासूर ।। ४ ।।

अभंग - गणपतीचा

अनन्य शरण आदि गणनाथा । पार्वतीच्या सुता लंबोदरा ।। १ ।।
कला विद्या सर्व सिध्दिचा नायक । कल्याणदायक वंद्यमूर्ती ।। २ ।।
मूषक वाहन पाशाकुंशधरा । हेचि दे दातारा कृपादान ।। ३ ।।
बैसुनि हृदयी वदवावे स्तोत्र । जेणे भालनेत्र वश्य होय ।। ४ ।।
शिवदास म्हणे करी प्रेम वृष्टी । जेणे पडो मिठी शिवापाई ।। ५ ।।

अभंग - सकाळचा

उठोनिया प्रातःकाळी । नाम घ्यावे शिवाचे ।। १ ।।
तेणे अविद्येचे ज्ञान । अवघे नासे जीवाचे ।। २ ।।
प्रेमे त्रिकाळ जपता । मोक्षपद येते हाता ।। ३ ।।
भावे सर्वदा जपता । तद्रुपचि तु होसी ।। ४ ।।
जयाचिया निजध्यासे । अळी होतसे भ्रमरी ।। ५ ।।
मन्मथ शिवलिंग म्हणे । तैशा परी हे होय ।। ६ ।।

अभंग

उदंड गाती ते उदंड वर्णिती । उदंड सांगती क्षेत्र महिमा ।। १ ।।
कपिलाधार ऐसे स्थळ कोठे नसे । प्रत्यक्ष ते भासे कैलासची ।। २ ।।
पूर्वेकडोनिया वाहे शिवगंगा । उत्तरेसी आहे भागीरथी ।। ३ ।।
पंचकुंड जे का पवित्र ते तीर्थ । समाधी मन्मथ महाराजांची ।। ४ ।।
ऋषी सहीत जे का वसोनि पांडव । ईच्छितार्थ सर्व लाधले हो ।। ५ ।।
देह समविता कपील महामुनी । वसे तया स्थानी सर्वकाळ ।। ६ ।।
शिवदास म्हणे आम्हा दीनासाठी । स्थळ हे धूर्जटी निर्मीयेले ।। ७ ।।

अभंग

उठा उठा शिवराजा श्री मन्मथ महाराजा ।

तुम्ही तारक सकळ सद्‌गुरु महाराजा ।। १ ।।

शिव भजनाचे ताट करुनी जग उध्दरीले ।

अभंग रुपी महाज्ञान जगी पेरियेले ।। २ ।।

कपिलधार क्षेत्र रम्य जागा पाहिली ।

भक्त भेट देता उभी सद्‌गुरु माऊली ।। ३ ।।

बसवदास म्हणे स्वामी सद्‌गुरु शिवलिंगा ।

काकड आरती ओवाळीतो तुम्हा भव भंगा ।। ४ ।।

अभंग

उठा भक्त जन चला जाऊ राउळासी ।

विनवू त्या शंकरा मुक्ती दान मागु त्यासी ।। १ ।।

मिळुनि अवघा मेळ करीती शिवनाम घोष ।

ब्रह्मादिका देवा नाही प्रेमाचा रस ।। २ ।।

भक्त विदेहि झाले नाचती बहु आनंदाने ।

वाकुडे करता मुख मानी कोण उणे ।। ३ ।।

शिवदास म्हणे मोठी गलबलाट झाली ।

काकड आरती करिता उठा उठी गेली ।। ४ ।।

शिवपाठ

(अभंग १)

शिवपाठ करा शिवपाठ करा । चौऱ्यांशीचा फेरा चुके येणे ।।१।।
शिवाविण अन्य वेदशास्त्र पाठ । व्यर्थ खटपट जाणावी ते ।।२।।
शिवनाम पाठ जया सर्व काळ । काळाचाही काळ होय तो ।।३।।
शिवदास म्हणे असार संसार । शिवनाम सार तया माजी ।।४।।

(अभंग २)

शिवनाम पाठ ज्या नरा सर्वदा । समाधिस्त सदा जाणावा तो ।।१।।
निर्गुण समाधी साधीता कठीण । अनिवार मन होय तेथे ।।२।।
शिवाच्या स्मरणे शिवरूप मन । अनायासे जाण होत असे ।।३।।
शिवदास म्हणे भृंगी कीट न्याय । शिवरूप होय निश्चयेसी ।।४।।

(अभंग ३)

शिवनाम किर्ती सदाचारी वेद । वर्णिती सद्‌गद्‌ होऊनिया ।।१।।
साही शास्त्रे ज्याच्या नामी परायण । सदा गाती गुण तयाचेची ।।२।।
अठराही पुराणे शिवलीला गाती । ऐसा उमापती समर्थ जो ।।३।।
शिवदास म्हणे त्याचे नाम वाचे । घेता मग कैचे भवभय ।।४।।

(अभंग ४)

शिवनाम पाठ सदा प्रेमयुक्त । श्रीहरी करीत स्वात्महिता ।।१।।
विधी इंद्र चंद्र गंधर्व सुरवर । ध्याती उमावर स्वार्थालागी ।।२।।
ऋषि मुनी योगी साधन सिध्यर्थ । गाती विश्वनाथ सर्वकाळ ।।३।।
शिवदास म्हणे सर्वांशी तो ध्येय । असे मृत्युंजय पहा सत्य ।।४।।

(अभंग ५)

उपनिषद जे का अथर्वणशीर । उभारुनि कर गर्जताहे ॥१॥
महद्भूत एक रुद्र भगवान । येर सर्व जाण अंश त्याचे ॥२॥
ऐसा सर्वोत्तम असे माझा शिव । एकवेळा नांव घेता तारी ॥३॥
शिवदास म्हणे मग जे सतत । उच्चारिता त्याते उणे काय ॥४॥

(अभंग ६)

असकृदुच्चारे श्वेतादि करुनि । कैलास भुवनी पावले की ॥१॥
पुराणी प्रसिद्ध असती या कथा । गेले मोक्षपंथा असंख्यात ॥२॥
दोषीयांचे दोष हरुनिया मुक्ती । द्यावयाची शक्ती नामी बहु ॥३॥
शिवदास म्हणे ऐसे शिवनाम । उच्चारिता जन्म मृत्यु खंडे ॥४॥

(अभंग ७)

नामावाचुनिया आणिक साधन । करिता ते मन नावरेची ॥१॥
योग याग तप प्राणायामादिक । कलिमाजी देख न साधती ॥२॥
शिवनाम पाठे अनायासे मन । होतसे उन्मन निश्चयेसी ॥३॥
शिवदास म्हणे शिवनाम स्मरा । साधन पसारा टाकोनिया ॥४॥

(अभंग ८)

साधनांचे सार योग्याचे जीवन । योगासी कारण मुख्य नाम ॥१॥
प्राणायाम बीज तयाचे भुषण ।मुमुक्षुसी जाण मोक्षपद ॥२॥
ऐसे शिवनाम सर्वासी कारण । म्हणोनि स्मरण करा सदा ॥३॥
शिवदास म्हणे शिवनामापुढे । साधन बापुडे अन्य किती ॥४॥

(अभंग ९)

तीर्थ व्रत दान केले जे पुष्कळ । तरी पावे फळ नोव्हे मोक्ष ॥१॥

तैसे नोव्हे नाम माझ्या शंकराचे । उच्चारिता वाचे होय मोक्ष ॥२॥

सर्वकाळ प्रेमे वाचे उच्चारिता । व्हावया मुक्तता नवल काय ॥३॥

शिवदास म्हणे तयाचे दर्शन । घेता जीव जाण उद्धरती ॥४॥

(अभंग १०)

सदा प्रेमयुक्त जपा शिवनाम । सकळ ही काम टाकोनिया ॥१॥

तयाचे संचित जातसे जळोनि । नासे क्रियमाण नाम बळे ॥२॥

प्रारब्ध तो त्यांचे सरतसे भोगे । मग देह त्यागे शिवचि तो ॥३॥

शिवदास म्हणे महात्म्य नामाचे । कोठवरी वाचे वर्णावि हो ॥४॥

(अभंग ११)

शिवभक्तीवीण केले जे सत्कर्म । तरी ते दुष्कर्म होय पहा ॥१॥

दक्षप्रजापति यज्ञ करू गेला । शिरच्छेद झाला तयाचा की ॥२॥

चंडादि सद्भक्त वधुनि पितर । पावले सत्वर मोक्ष पदा ॥३॥

शिवदास म्हणे ऐसी शिवभक्ती । कर्माकर्मी गुंती नसे जेथे ॥४॥

(अभंग १२)

अलभ्य हा लाभ नरदेहा ऐसा । लाभला तो कैसा गमाविता ॥१॥

मग कोण्या देही कराल सार्थक । पहा हो विवेक करोनिया ॥२॥

यालागी तुम्हा सांगतो ही सोय । गेली घडी न ये परतोनि ॥३॥

शिवदास म्हणे सदाशिव शिव । स्मरा मग भव कैचा तुम्हा ॥४॥

(अभंग १३)

भवरोगावरी दिव्य रसायण । औषध हे जाण शिवनाम ।।१।।
तयाविण अन्य करिता उपाय । जाणा ते अपाय होती सर्व ।।२।।
म्हणोनिया तुम्हा सांगतो हे हित । स्मरा हो सतत शिवनाम ।।३।।
शिवदास म्हणे मग भवभय । स्वप्नीही न होय बाधक ते ।।४।।

(अभंग १४)

कांता पुत्र वित्त देहादि प्रपंच । दिसतसे साच परि मिथ्या ।।१।।
म्हणोनिया त्यांची टाकुनिया आस । स्मरा शंकरास सुखा लागी ।।२।।
आपुल्या भक्ताते असे सुखकर । म्हणोनि शंकर नाम त्याचे ।।३।।
शिवदास म्हणे शंकरावाचोनि । कोण त्रिभुवनी सुखदाता ।।४।।

(अभंग १५)

आपुले कल्याण व्हावे ज्यांचे चित्ती । त्यांनी शिवाप्रति शरण जावे ।।१।।
कल्याण स्वरुपी कल्याणिरमण । नामहि कल्याणप्रद ज्याचे ।।२।।
शिवाचे ते नाम करिता स्मरण । शीघ्रची कल्याण होय त्याचे ।।३।।
शिवदास म्हणे कल्याणदायक । असे माझा एक शिवचि तो ।।४।।

(अभंग १६)

आसनी शयनी भोजनी गमनी । प्रेमे शुलपाणी स्मरावा तो ।।१।।
ऐसा निजध्यास लागता जागृती । स्वप्नीहि ते स्मृति सहज राहे ।।२।।
सुषुप्तीत जीव होय शिवीलीन । नसूनि स्मरण स्मृति असे ।।३।।
शिवदास म्हणे हाचि शिवयोग । असे शिरोभाग साधनाचा ।।४।।

(अभंग १७)

सुवर्णात नग नगी ते सुवर्ण । तैसेचि अभिन्न जीव शिव ।।१।।

ऐसे जन्मवरी करिता मनन । नावरेचि मन साधकासी ।।२।।

अंतरी तो ऐसा असोनि विचार । स्मरे निरंतर शिवासी जो ।।३।।

शिवदास म्हणे तयाचे ते मन । होतसे उन्मन शिव कृपे ।।४।।

(अभंग १८)

अन्न आच्छादन सुख दुःखादिक । प्रारब्धेची देख लभ्य जीवा ।।१।।

म्हणुनिया त्यांचे टाकुनि चिंतन । करावे स्मरण शंकराचे ।।२।।

नर देहामाजी अलभ्य हा लाभ । पार्वती वल्लभ गावा गीती ।।३।।

शिवदास म्हणे शिवस्मृतिवीण । पळभरी जाण राहु नये ।।४।।

(अभंग १९)

चौऱ्यांशी लक्ष जन्म फिरक्यांत । अवचित प्राप्त नर देह ।।१।।

तयाचे आयुष्य जाय ऐसे तैसे । पुनः तेचि असे शिरावरी ।।२।।

यालागी सावध होवोनी सत्वर । स्मरा निरंतर शिवनाम ।।३।।

शिवदास म्हणे मग ती चौऱ्यांशी । चुके निश्चयेसी सत्य जाणा ।।४।।

(अभंग २०)

अनंत जन्मीचे ज्या गाठी सुकृत । तोची शिवभक्त होय पहा ।।१।।

शिवनाम जया आवडे अत्यंत । तोची जीवनमुक्त जाणावा हो ।।२।।

ज्ञानाविण मोक्ष नव्हेची निश्चय । ऐसा हा संशय धरू नये ।।३।।

शिवदास म्हणे ज्ञानासी कारण । असे मुख्य जाण शिवची तो ।।४।।

(अभंग २१)

निर्गुणी निर्गुण सगुणी सगुण । त्रिगुणी त्रिगुण शिवची तो ।।१।।

ऐसे साधुमुखे जाणुनिया तत्व । स्मरता जीवत्व नुरे कांही ।।२।।

हा जरी आपणा न कळेची बोध । तरी नाम शुद्ध जपावे हो ।।३।।

शिवदास म्हणे जेणे शुद्ध सत्व । होय मग तत्व कळे स्पष्ट ।।४।।

(अभंग २२)

अव्यक्त चित्तासी योजु जाता बळे । कष्टाप्रती गेले उपासक ।।१।।

बाहुबळे जैसे समुद्री तरण । हे जैसे कठीण तैसे तेही ।।२।।

शिवनाम बळे विश्व शिवमय । होय निःसंशय साधकासी ।।३।।

शिवदास म्हणे साधन हे श्रेष्ठ । शिवनाम स्पष्ट जपा तुम्ही ।।४।।

(अभंग २३)

सगुण प्रसाद श्रुती म्हणे मोक्ष । साधुचाही पक्ष हाची असे ।।१।।

दयाळुत्व आदि गुणे जो सगुण । हे नसे निर्गुण अगुण ते ।।२।।

तयाचा प्रसाद तयाचेची नाम । स्मरावे ते प्रेम भरे सदा ।।३।।

शिवदास म्हणे मग तो प्रसन्न । होऊनिया जाण मुक्त करी ।।४।।

(अभंग २४)

नाम स्मरे त्याच्या रूप लागे पाठी । न ईच्छिता भेटी देऊ द्यावे ।।१।।

नामावीण अन्य करिता साधन । नेदी भेटी जाण शीघ्र त्यासी ।।२।।

नाम स्मरे तोचि आवडे अत्यंत । म्हणोनि धावत भेटावया ।।३।।

शिवदास म्हणे शिवनाम ऐसे । साधनची नसे दुजे अन्य ।।४।।

(अभंग २५)

रूप तेची नाम नाम तेची रूप । नाम ऐका माप विशेष का ।।१।।

ज्ञान होवोनिया स्वरुपाचे ध्यान । करी तेव्हा जाण मुक्त होय ।।२।।

तैसे नोव्हे नाम स्मरे त्यासी ज्ञान । देऊनि सत्वर मुक्त करी ।।३।।

शिवदास म्हणे विश्वरुपाहून । अधिक म्हणोन स्मरा नाम ।।४।।

(अभंग २६)

अन्य साधनांत साध्य असे भिन्न । तैसे नसे जाण नामामाजी ।।१।।

यात साध्य आणि साधन ते एक । पहा हो विवेक करोनिया ।।२।।

नाम तेची रुप रुप तेचि नाम । ऐसे ते निगम गर्जताहे ।।३।।

शिवदास म्हणे नामा ऐसे आन । साधनची जाण नसे दुजे ।।४।।

(अभंग २७)

सर्व साधनात नाम असे सार । किती वारंवार सांगावे हो ।।१।।

तीर्थ व्रत नेम दान यज्ञादिक । न फळेची देख नामावीण ।।२।।

भुक्ति मुक्ति ज्ञान वैराग्यादि सर्व । न लाभे वैभव नामावीण ।।३।।

शिवदास म्हणे नामाचे महत्व । स्मरे त्यासी तत्व कळे त्याचे ।।४।।

(अभंग २८)

शिवपाठ पाठ नित्य नेमे ज्यासी । यम वंदी त्यासी दुरोनिया ।।१।।

ब्रह्मा विष्णु आणि इंद्रादि सुरवर । करिती सत्कार बहु त्याचा ।।२।।

चरणीचे त्याच्या तीर्थ मागावया । येती धाऊनिया सर्व तीर्थे ।।३।।

फलश्रुतीसह असे अठ्ठावीस । म्हणे शिवदास अभंग हे ।।४।।

(अभंग २९)

न कळोनी अर्थ पाठ करी भावे । तोही ज्ञान पावे शिवकृपे ।।१।।

भाव ही नकळे ऐसे जे का मुर्ख । स्त्रिया बाळादिक हो कां कोणी।।२।।

त्याही नित्य नेमे करिता पठण । क्रमे भाव ज्ञान लाभती की ।।३।।

शिवदास म्हणे पुर्व संख्येहून । अधिक हा जाण एक असे ।।४।।

(शिवपाठ संपुर्ण)

अभंग संताचा

माझ्या मना लागो चाळा । पहावया संत डोळां ।। १ ।।

आणिक नाही मज चाड । न लगे संसार धड गोड ।। २ ।।

तरीच फळ जन्मा आलो । ऊमारंगी धन्य झालो ।। ३ ।।

मन्मथ म्हणे महादेवा । देई सज्जनाची सेवा ।। ४ ।।

भजन

गुरुराज माऊली । गुरुराज माऊली ।।

गुरुराज माऊली । गुरुराज माऊली ।।

ऊत्तर अभंग

तुजलागी हेंची मागो । तुझे नामी छंद लागो ।। १ ।।

सुखें संसारासी घाली । देई आवडी पाऊली ।। २ ।।

नको नीचांचा सहवास । नको साधूजनीं त्रास ।। ३ ।।

मोह पुत्र कलत्राचा । नको लोभ शरीराचा ।। ४ ।।

नको एकांती लोकांती । नको परनारी संगती ।। ५ ।।

म्हणे मन्मथ शिवलिंगा । देई चरणापाशीं जागा ।। ६ ।।

अभंग

अवघ्या शकुनाचा शकुन । झाले दर्शन संताचे ॥ १ ॥
पाप ताप दैन्य नासे । सुखा फुटें हो दोंदले ॥ २ ॥
होय जन्माचे सार्थक । एकाएकी समसाम्य ॥ ३ ॥
मन्मथ म्हणे फळा आले । मागील केले सुकृत ॥ ४ ॥

अभंग

स्मरण करा हो मनी भाव धरा हो ।
संसार सागर भक्तीबळे तरा हो ॥ १ ॥
अभ्राची साऊली तैसी संपदा भुली ।
साच नोहे वश करा गुरुमाऊली ॥ २ ॥
विषय मदा हो काय भुलाल सदा हो ।
टाळी वाजवुनी मुखी गुरुनाम भजा हो ॥ ३ ॥
बसवलिंग हेचि तुम्हा हित सांगतो ।
सर्व जगी ब्रम्ह व्हावे हेचि मागतो ॥ ४ ॥

अभंग

शिवव्दारी ऊभी संताची मंडळी ।
ही माझी दीपवाळी आनंदाची ॥ १ ॥
काया कनक ताटी पंचप्राण ज्योती ।
ओवाळु पशुपती मनोभावे ॥ २ ॥
ओवाळीन दोघां पार्वती शंकरा ।
ऊचित दातारा हेचि द्यावे ॥ ३ ॥
लिंगेश्वर म्हणे हेचि मज द्यावे ।
अहर्निशी घ्यावे नाम तुझे ॥ ४ ॥

आरती

आरती शिवराजा । मन्मथ स्वामी महाराजा ॥
वेदांताचे सार । मुख्य पेरिले बीज ॥ धृ ॥
समाधि महास्थळी । सर्प व्याघ्रांची जाळी ।
निर्वैर श्वापदें हो । समदृष्टीने न्याहाळी ॥ १ ॥
शिवभक्ति लोप झाली । विश्व शिवमय केले ।
ग्रंथ हा परमरहस्य । गुह्य प्रगट केले ॥ २ ॥
अभंगी निरुपण । अनुभविले ज्ञान ।
आनंद शिवदासा । सर्व शुभ कल्याण ॥ ३ ॥

जय शंकर जय शिव शंकर
जय शंकर जय शिव शंकर

अभंग

सुखी असो ही मंडळी । जे का ध्याती चंद्रमौळी ॥ १ ॥
काम क्रोधाचा ओळसा । नोहे माझ्या शिवदासा ॥ २ ॥
अहंकार हा दुस्तर । याचा पडो द्या विसर ॥ ३ ॥
व्हावे चिरंजीव सर्व । ज्यांचे चित्ती माझा शिव ॥ ४ ॥
शिवदास म्हणे त्याचे । व्हावे कल्याण त्रिवांचे ॥ ५ ॥

अभंग

नमस्कार माझा श्रोते लहान थोरा ।
नारी आणि नरा सर्व याती ॥ १ ॥
सांडोनी आळस लाज अभिमान ।
करावे भजन प्रेमानंदे ॥ २ ॥
शिवहर शब्दाची करुनी आरोळी ।
लावावी देऊळी दाद माझी ॥ ३ ॥
अशक्त मी आहे दुर्बळ सर्वथा ।
म्हणोनिया माथा श्रोत्यापायी ॥ ४ ॥
शिवदास म्हणे सकळ मिळोनी ।
द्या शिव चरणी लोटोनिया ॥ ५ ॥
शंभो रे हर शंभो रे
शंभो रे हर शंभो रे

अभंग

गुरु प्रसादाची थोरी । महिमा असे श्रेष्ठ भारी ॥ १ ॥
प्रसाद घेतांची स्वामीचा । नाश होय षडरिपुंचा ॥ २ ॥
मी तूं पणा हा नुरे रे । सुख अक्षयी घेई रे ॥ ३ ॥
सुख ब्रम्हानंद होय । गगनी आनंद न माय ॥ ४ ॥
लक्ष्मण म्हणे घ्या हो । जन्म मृत्यु चुकवा हो ॥ ५ ॥

भजन

शिवहर शिवहर । शिवहर शिवहर ।
शिवहर शिवहर । शिवहर शिवहर ।

।। श्री वैद्यनाथ स्तोत्र ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्री वैद्यनाथायनमः । श्री भवानी शंकरायनमः । धन्वंतरी स्वरुपाय । अमृतार्थ प्रदायिने। शिवायच दिनानाथाय । वैद्यनाथाय ते नमः । श्री जय जय गजवदना । सिंदुरधारणा शिवनंदना । वक्रतुण्डा एकवदना । विनायका तुज नमो ।। १ ।। ब्रह्मतनया जी सरस्वती । जिची जिव्हेवरी वस्ती । स्तोत्र करावया स्फूर्ती । वाग्देवते देई मज ।। २ ।। तैसे संत सद्‌गुरु मुनी । जे सदा ज्ञान खाणी । नमन भावे तया करुनी । ग्रंथारंभी विनवीतसे ।। ३ ।। हे गुरो पुरुषोत्तमानंद सरस्वती । हरिहरादिक आनंदमुर्ती । ग्रंथ करावया शुध्दस्मृती । निशिदिनी द्यावी मजलागी ।। ४ ।। की हें वैद्यनाथ स्तोत्र । पर्यली ग्रामीचा महिमायत्र । अनुपम हे क्षेत्र । महिमा त्यांचा वर्णावा ।। ५ ।। म्हणुनी प्रार्थितो योगीजनां । सर्वश्रोते सज्ञना । महाकवी गुरुजनां । वंदन भावे करितसे ।। ६ ।। वहुतारक स्तुती एक । जी जाळी अनंतदोषक । संतोषोनि कैलासनायक । मनकामना पुरवीतसे ।। ७ ।। हर हर गौरीरमणा । वामांगी पार्वती अंगना । ज्योतिर्लिंगा भवहरणा । करितो प्रार्थना ती ऐका ।। ८ ।। मातेपरि त्वा पोषण केले । पित्या समान शिकविले । सर्व भवबंधनापासुन वहिले । केले पाहिजे रक्षण ।। ९ ।। मानावे जरी हे अघटित । कैसे हे विश्वसृजित । स्वाभाविक मातृ पितृ पद । अंगी आले सहजची ।। १० ।। प्रेमासाठी परमेश्वरा । दीनानाथा सर्वेश्वरा । साधु कामना पुर्ण करा । संकटी भक्ता रक्षिशी ।। ११ ।। माझी ऐकावी भावना । कृपाकारका भवमोचना । घालोनी मज गर्भाधाना । अवचट माया दाखविली ।। १२ ।। कष्टी जाहलो तुज नोळखिता । म्हणोनि धरिले पाय आता । कृपाकारका जगत्राता । अपराध माझा जठरी घाली ।। १३ ।। अपराध माझे अनंत । आकाशावरी गेले चढत । तु दयासागर दयावंत । आपुलीया ब्रीदा सत्य करी ।। १४ ।। सहस्त्र अपराध बाळाचे । खेद न मानी माता त्याचे । तैसेचि या बालकाचे । अपराध पोटी घाली गा ।। १५ ।। कोळश्याहुनी कृष्ण । मन भरले दंभे करुन । दयावंत दंभाते हरुन । आपुले परी नटवावे ।। १६ ।। धात्रीफळांची गोडी । असेल कोठूनी रोकडी । निश्चलता ती दगडी ।

पाझर कैसा वाहेल ।। १७ ।। अन्यायी अपराधी पतीत । यासी उध्दरणें तुज उचित । अनेकांपरि रक्षित । समर्थ करणे सदाशिवा ।। १८ ।। थोराच्या येथील सारमेय । वचक त्यांचा सर्वापहाय । तैसे तूझेचि हे बाल्य । यात कमीपणा तुजलांचि ।। १९ ।। धन अर्थ तुज जवळी वसत । मी भिकारी लोकांच्या दारात । येणे तुझे ब्रीदसत्य । राहील कैसे नीळकंठा ।। २० ।। कोषाध्यक्ष तव यक्षराज । दारोदारी फिरवीसी मज । तेणे पुरुषार्थ वृषभध्वज । कैसे काय येईलयां ।। २१ ।। द्रुपद कन्येशी महंता । वस्त्रे पुरविशी भाग्यवंता । माझ्यासाठी कृपणता । आणिली कैसी दिगंबरा ।। २२ ।। ममत्वेने द्रौपदीशी । मध्यरात्री अन्न पुरविशी । अनेक सहस्त्राधिक ऋषी । तृप्त झाले क्षणमात्रे ।। २३ ।। ऐसे असूनी मजसीं । अन्नासाठी फिरविशी । हिंडतसे दशदिशी । कृपा कैशी न ये तुज ।। २४ ।। शिरोमणि अंगीकारितां । मधुर वचनें प्रार्थितो आता । अंगिकार केलिया तत्वतां । मज धरी दृढ करी ।। २५ ।। वडवानळ सागरे अंगिकारीला । तेणे होतसें विव्हळा । ऐसा असोनि साठविला । जठरी अग्नि समुद्राने ।। २६ ।। भूमिचा भार घेई कूर्म । न सोडी तो आपुले वर्म । विश्वांचे ओझे सम । अंगिकारी रें गिरिजापती ।। २७ ।। रत्न निघाले हळाहळा । प्राशितां कंठ झाला निळा । त्याग न केला महाकाळा । दयावन्ता जगद्गुरो ।। २८ ।। अनेक माझे अपराध । वर्णांवया होतो खेद । दुराचारी दुष्ट पतित । नींचाहुनी नीच पै ।। २९ ।। विनंती ऐका गिरीजापति । नामी राहो ममंमती । पुनः पुनः परंज्योति । मागणे हेची विश्वेशा ।। ३० ।। आळशी विषयी मंद बुध्दी । धरी मनाशी कुबुध्दी । साधूजनां वक्रदृष्टी । सदा करी व्देष त्यांचा ।। ३१ ।। भाषणी नाही गोडी । दारे कपाटे मोडी । हिंसकापरि बहुपिडी । मोठेपणे गाजविली ।। ३२ ।। षड्रिपूने हे शरीर । केलें असे जर्जर । वासनादिकांचा थार । दृढतेने झाला असे ।। ३३ ।। जरी केली सर्व तरु शाखेची लेखणी । शाई केली समुद्र भरुनी । लिहिता माझे अवगुण धरणी । तरी पुरते न होई बां ।। ३४ ।। जरी मी निर्दयी निष्ठूर । पावन करी गा तू त्रिशूलधर । पावन केलिया डमरुधर । कोणी न गणती माझिया दोषा ।। ३५ ।। रतलीं नीचा नृपा । दासी कोण म्हणे तीज पा । लोखंड परिसता झडपा । पूर्वस्थिती मग नसे ।। ३६ ।।

छोटी नदी गावातील । गंगेशी मिळता निर्मळ । प्राप्त झाले गंगाजळ । तया सर्व मानिती ।। ३७ ।। कागविष्ठेपासून । अश्वत्थ झाला उत्पन्न । तया सर्व देती मान । इंदिरावर म्हणूनी पुजिती ।। ३८ ।। त्वन्नाम सतत गातो । शिव चरणां स्मरतों । नंदिकेश्वरों भजतों । रात्रं दिन ।। ३९ ।। अपराधी नर असतां । उदरी घालीजे तत्वता । धरोनिया हाती गदा । रक्षण करी रे सर्वदा ।। ४० ।। माझियां कर्माचा चेंदा । सत्वर करी पार्वतीशा ।। ४१ ।। ईश्वर नामी अगाध शक्ती । तेणे पापे अगाध जळती । दयासागरा उमापती । अंतःकरणी स्थिर व्हावे ।। ४२ ।। पतितपावन तुझे नाम । कलिमल दहना करीतो स्मरण । भवतारणा भवाब्धितून । संकटातुनी रक्षितसे ।। ४३ ।। ऐकावी प्रार्थना गिरीजापति । तुझिया नामी राहो मती । मागणे हेचि सतत सतती । ज्योतिर्लिंगा गिरिवरा ।। ४४ ।। हरिहर एकरुप । कामना पुरविती अमूप । दोघानींही साप । जवळी केला असे ।। ४५ ।। त्र्यंबका त्रिपुरहरा । त्रितापहरा मधुहरा । अघबकहरा गंगाधरा । मुरहरा तुज नमो ।। ४६ ।। महेशा गिरीशा जगदीशा । वसुदेवसुतां रुक्मीणीशा । नागभूषणा नागेशा । पुरुषोत्तमा गणराया ।। ४७ ।। अनाद्यता विश्वंभरा । विश्वचालका हिमधरा । व्योमकेशा उमावरा । ऋतुध्वंसा ऋतुकरा ।। ४८ ।। स्थाणू अणू महिमाणूं । गुणाणूं तूं गुणपूर्ण । स्मरणी कीर्तनू गाणूं । यशाणू तुज काय वाणू ।। ४९ ।। श्रीधरवरा महादेवा । सतवरा वासुदेवा । भक्तकाम कल्पद्रुमा सदाशिवा । भक्तेच्छा पूरका हे शंभो ।।५०।। जगदीशा जगदुध्दारा । परात्परा विश्वंभरा । पद्मोद्भवा दामोदरा । प्रकाशका गहनरुपा ।। ५१ ।। कैलासनाथा मुळपुरुषा । सनातना पुर्णब्रम्ह निर्दोषा । मंगलकारका मंगळाधीशा । मदनांतका आदिमूर्ते ।। ५२ ।। श्रीवत्सला श्रीकरधरा । भवनाशका उमावरा । दुष्टदैत्यसंहारका स्मरा । सुखकरा सदाशिवा ।। ५३ ।। उग्रःकपर्दी श्रीकंठ । काल भृत्शितिकंठ । अनादिअलक नीळकंठ । वामदेवा देवेशा ।। ५४ ।। कैटभारी विषकठरा । कमनीया निळकंठा । कामात्मजा कंबुकठा । कमललोचना कामारे ।। ५५ ।। श्रीनिधी श्रीवत्सलांछनधर । भक्तेशचक्रधर । सव्यहस्ती त्रिशुलधर । कामांतक कामारी ।। ५६ ।। दिक्व्यापक दिगंबर

। नागभुषण नागधर ।
नागाधिपते डमरुधरा । नागेन्द्रसुत्री सुत्रात्मा ।। ५७ ।। हें त्रिशूल डमरुधरा । कंदर्पबाण संहारकरा । नंदीवहना भक्तप्रियकरा । मृडानीवरा सदाशिवा ।। ५८ ।। करुणालया कृपासमुद्रा । व्याघ्रांबर दिव्यमुद्रा । कामनाशका कामाद्री । कैलासवासिया मुळमूर्ते ।। ५९ ।। भस्मांगका भस्मलेपना । रुद्राक्ष धारका गजचर्म वसना । गणेशताता असुरमर्दना । गणाधिराजा आदिमुर्ते ।। ६० ।। कपालधरा कृपासागरा । कामांतका कर्पूरगौरा । कमनीया करुणावतारा । प्रसन्न होई मज आता ।। ६१ ।। ऐसा प्रार्थितां गौरीश । ह्रदयी आठवित महेश । तत्क्षणी प्रगटला ईश । पार नसे त्या सुखा ।। ६२ ।। अंतःकरणी ठसली ही मुर्ती । काय वर्णू ती स्थिती । आपण स्वये उमापति । मम वाणी वदवितसे ।। ६३ ।। व्यास म्हणती एका श्रवणें । त्या स्वरुपा काय सांगणे । सुत सांगति यथामतिने । शौनकादिक ऐकती ।। ६४ ।। कर्पुरगौर करुणावतार । पंचमुख सुकुमार । पादयुगुल आरक्ताकार । कमलाकार जैसे की ।। ६५ ।। पादांगुली सरळ सुरेखा । जैसी नखे चंद्रलेखा । अपुर्व सुनीळ घोटीव देखा । पोटरिया सुंदर ।। ६६ ।। चेंडुपरि गुडघे जाणा । मांडीया जानुस्थळांना । बारीक कटी नाभीस्थाना । त्रिवळीं रेषा उमटली ।। ६७ ।। त्रिवळीचे तीन गुण । उत्पत्ती नाश पालन । केले ब्रह्मांड उत्पन्न । ऐशी शोभा नाभीची ।। ६८ ।। समावले नाभी । भक्तांना म्हणे ना भी । ऐसी विश्वाची गाभी । अभाविक नेणती ।। ६९ ।। त्रैलोक्य व्याघ्रांबर । रुद्रांग जो गंभीर । प्रसन्न वदन कर्पूरगौर । वैद्यनाथ परमात्मा ।। ७० ।। जठर अति सुण्दर । वक्षस्थळ विशालपर । नरमाला सुरेख तर । विद्युल्लतेचिया परि ।। ७१ ।। ह्रदयी भक्त लांछन । गोपति जयाचे वाहन । ऐसा तो वैद्य भगवान । वैद्यनाथ शोभतसे ।। ७२ ।। अजानबाहु दशभुज । शशिसम नखे तेज । गणांचे करावया काज । आयुधे हाती धरियेली ।। ७३ ।। करी कंकणे अमोलिक । अंगुलिया माजी अगणिक । बाहुमाजी अनेक । भूषणें धारण केले पै ।। ७४ ।। शंखापरि ग्रीवा । अहर्निशी शिव भजावा । जेणे पावे सदा वैभवा । मुख चंद्रमा साजिरा ।। ७५ ।। स्फटिकासमान दंतपंक्ति । रक्तवर्ण जिव्हाज्योती । अधरांमृत प्राशिची गती । सुख जाणे ती अपर्णा ।। ७६ ।। सुंदर

सरळ नासिक । जेणे झाले अनलांसी सुख । तेज गण्डस्थळीचे विशेख । चकमकीत सर्वदा ।। ७७।। त्रिभुवनीचें जे तेज । धारण करी अज । अनलाग्नी आपज । त्रिनेत्री शंकर परमात्मा ।। ७८ ।। धूर्जटी भृकुटी सुनील । अभिनव श्रवण युगुल । कुण्डलांच्या फाकती कळा । किती बा सोहळा वर्णू मी ।। ७९ ।। उत्तम विशाल भाळी । वरि भस्माची त्रिवळी । त्रिताप जणू जाळी । चण्दना परि शोभतसे ।। ८० ।। कुरळ केश जटेमाजी गंगा । पावन करी त्रिजगा । चण्द्र मस्तकी धरिला गां । धन्वंतरि ऐसा देखिला ।। ८१ ।। औषधीयुक्त पहाडा वरी । वैद्यराज धन्वंतरी । वास करी निरंतरी । म्हणूनी वैद्यनाथ नाम पावला ।। ८२ ।। द कारे दया परिपूर्ण । य कारे यजन हवन । वल्लीयांचे विशेष गुण । वैद्यनाथ नाम पावला ।।८३।। पुजा करु आता त्याची । वैद्यनाथ प्रभु शिवाची शुध्द भावार्थे साची । अपर्णेसहित त्रिपुरांतका ।। ८४ ।। स्वयंभु शंकर आपण । निर्मळ भावना पाहुन । स्वीकारितसे अर्चन । वृषभध्वज गंगाधर ।। ८५ ।। हरासि आवाहन । स्मरासी ते ध्यान । भृगासि पाद्य आचमन । त्र्यंबकेशा मधुपर्किजे ।। ८६ ।। त्रिपुरांतका पंचामृत । गंगाधरा अभिषेकित । दुग्ध धारा रुद्रोक्त । शुध्दोदके नान्हिला ।। ८७ ।। करु तुज मंगलस्नान । शत कलशे करुन । गंगाजल धारा पावन । अभिषेकिला वैद्यनाथ ।। ८८ ।। अम्वर ब्रह्मसूत्र भस्म । प्रभवाय चंदन अक्षता परम । प्रवरांशी बिल्वदल पुष्प बहुत्तम । रुद्राक्षादि करुनिया ।। ८९ ।। वरदोत्तमा अष्टोत्तर शत पद्म । वरांशी धुप सुगण्धोत्तम । नाना दक्षिणा सुवर्ण । दीप नैवेद्य सर्वेशां ।। ९० ।। नारिंग श्रीफळ तांबूल । पर्णादिएला लवंग सकळ । अत्यानंदे निर्मळ । राजोपचारे करुनीया ।।९१ ।। पद्मरागादि अलंकार । शिरी धरिले छत्र चामर । गोमेदांच्या पादुका सत्वर । व्योमकेंशा वाहिल्या ।। ९२ ।। वैद्यनाथ रुद्रामहेशा । पूजा स्वीकारी विश्वेशा । वंदन करुनि सर्वेशा । मग प्रदक्षिणा आरंभिली ।। ९३ ।। अर्ध प्रदक्षिणा रुद्रांशी । नंदिकेंशापासुनी चण्डाशी । पुनश्च स्पर्शी वृषाषी । नहाणी पर्यन्त जावे ।। ९४ ।। नंदीस स्पर्श करुनी । वैद्यनाथ देखिजे शृंगामधुनी । एवं त्रिवार करिता क्षणी । कैलास पद पाविजे ।। ९५ ।। षोडशोपचारे उमाकांत । यथाविधी पूजिला ह्रदयांत । प्रार्थना आरंभिली बहुत । वरप्रसाद मागावया ।। ९६ ।। जय जयाजी निगमागमा ।

गुणातीत परब्रह्मा । जय जयाजी आत्मारामा । जगदुध्दारा जगद्गुरो ।। ९७ ।। जय जयाजी त्रिनेत्रा । जय जयाजी त्रिभूवन सूत्रा । जय जयाजी भस्मगात्रा । अव्यक्तव्यक्ता परमात्मा ।। ९८ ।। जयजयाजी भक्तपालका । जयजयाजी कैलासनायका । जयजयाजी विश्वरक्षका । आनंद दायका हे स्वामी ।। ९९ ।। जयजयाजी पंचवदना । जयजयाजी वरप्रदाना । जयजयाजी शून्यातीत निर्गुंणा । विज्ञापना ऐका माझी ।।१००।। देई मज उत्तम वर । घडेल जेणे परोपकार । मागणे हेची वरचेवर । अमृतेशा तुज मागतसे ।। १०१ ।। हे स्तोत्र जो पठण करी । नसावे तयांसि दुःख संसारी । पठण मात्रे चराचरी । विजयी करी जगाते ।। १०२ ।। विद्यार्थ्यांशी विद्याधन । लग्नार्थीयाचे व्हावे लग्न । पुत्रार्थीयाची इच्छा पूर्ण । पुत्र देवुनी करावी ।। १०३ ।। पुत्र व्हावा पितृभक्त । विजयी पंडित भाग्यवंत । शिवचरणी सदारत । अंतः करण जयाचे ।। १०४ ।। शतायुषी उदार । अविरोत्तम सादर । व्याधिष्ठांची पीडाहर । हरण कीजे तत्काळ ।। १०५ ।। कुष्ठ अपस्मार क्षयरोग । स्तोत्र पठणे सरावा भोग । योगियासी उत्तम योग । ग्रंथ पठणें साधावा ।। १०६ ।। दरिद्री व्हावा श्रीमंत । घरी असावे धन बहुत । शत्रूंचा व्हावा निःपात । ग्रंथ पठणे करुनिया ।। १०७ ।। वश व्हावी सभा । सर्व कामना शुभा । व्यवहारिया लाभा । ग्रंथ आदरे वाचिता ।। १०८ ।। शस्त्रे न लागावी युध्दीं । विद्यार्थ्यांशी सद्बुध्दी । अपयश न यावे कधी । ग्रंथ पठणे भूतेशा ।। १०९ ।। साधू साधू म्हणोत सर्व । मोक्ष साधन अंती व्हावे । कोणासही नसावा गर्व । भाव चित्ती असावा ।। ११० ।। प्रार्थनेशी देईजे मन । जेणे कैलास पद पावेन । एवढे मागणे वरदान । कृपा करा अमृतेशा ।। १११ ।। प्रसन्न झाला गौरीरमण । जगमित्राशी दिधले वरदान । ग्रंथाक्षरी माझे वचन । यथार्थ जाण निश्चयेशी ।। ११२ ।। स्तोत्री विश्वास धरोनी । जो करील पठण रात्रंदिनी । तयांलागी मी मृडाणी । क्षणभरीही न विसंबे ।। ११३।। इच्छा धरुनी करील पठण । मी सांगतो त्याचे प्रमाण । एक्केचाळीस दिवस परिपूर्ण । वाचता कामना सिध्द होती ।।११४।। पुत्रासाठी मास तीन । धनार्थींयाने एकविस दिन । संतानार्थीयाने षण्मास पूर्ण । स्तोत्र पठण करावे ।। ११५ ।। महारोगादी निरसने

। तीन वर्षे वाचावि जाण । सिध्द कामना साधने । पडळ पठणे साधती ।। ११६ ।। सत्य सत्य हे त्रिवारी । ऐसे बोलिला धन्वंतरी । जो खोटे मानील साचारी । तया अधःपात निश्चित ।। ११७ ।। विश्वास धरील ग्रंथ पठणी । तया कृपा करील त्रिशुळपाणी । दिधलां वर कृपा करुनी । अनुभवे तुम्हा कळेल ।। ११८ ।। मार्कण्डेयाच्या आकांता । मृत्युंजय धावला तत्वता । बाण रावण वरदाता । भोळा शंकर प्रसन्न ।। ११९ ।। कूर्मीन दृष्टीने संगोपन । करी बाळाचे पोषण । तैसेचि करी भव पालन । गोवत्सापरी साचे ।। १२० ।। प्रदोष शिवरात्री सोमवार । एकादश आवर्तने साचार । पठण करिता निरंतर । वैद्यनाथ प्रसन्न तया ।। १२१ ।। श्रावणमासी निर्धारी । नित्य हे स्तोत्र पाठ करी । महाशिवरात्री भितरी । धन्वंतरी प्रसन्न तया ।। १२२ ।। एकांती एकाग्र चित्ती । अनुष्ठान कीजे मध्यरात्री । वैद्यनाथ दर्शन शिवरात्री । हरिहर प्रगटले ।। १२३ ।। ऐसा तु दयेचा दातार । बाळावरी कृपेचा पाझर । हाचि तुझा निर्धार । आदिनाथ नाम तुझे ।। १२४ ।। श्रीगुरुकृपा अलौकिक । संतोषोनि पर्यलि नायक । वर दिधला अमोलिक । जेणे सुख सकळासि ।। १२५ ।। हा ग्रंथ लिहिता मोद । वचनी न धरावा भेद । चित्ती होई परमानंद । अनुभवोनि सांगतो ।। १२६ ।। या स्तोत्राचा महिमा । श्री वेदव्यासे सांगितला उत्तमा । पठणें जाती कैलास धामा । पारायणे कार्यसिध्दी ।। १२७ ।। लक्ष्मीशी सांगे वैकुण्ठ नायक । अनुभव घ्यावा सकळिक । पार न जाणती ब्रह्मादिक । ऋषीं आश्चर्य करिताती ।। १२८ ।। प्रत्यक्ष प्रगटले चण्द्रमौळी । त्रैलोक्य भजता त्रिकाळी । ध्याती योगी नि वनमाळी । कांतीनगरी वास जया ।। १२९ ।। प्रभाकर क्षेत्री सतत । शिव वसे ज्योतिर्लिंगात । वैद्यनाथाचा महिमा अद्‌भूत । पर्यलि क्षेत्री जाणावा ।। १३० ।। ब्रह्मगंगा वेणूगंगा । मध्ये वाहे सरस्वती चांगा । स्नाने करिता पापे भंगा । तीर्थस्नाने मुक्ती पावे ।। १३१ ।। इंद्रादि दिक्‌पाल । लिंगरुपी मंदिरी वसत । निशिदिनी शिव सेवित । रक्षण करिती सर्वांचे ।। १३३ ।। पूर्वे सिध्दीविनायक । दक्षिणे तीर्थ हरिहराख्य । पश्चिमे नारायण नगकारक । उत्तरे सोमेश्वर वसततसे ।। १३४।। श्रोतया विनवी जगमित्र ।। सुखे व्हावे इहपरत्र । पाहता पर्यलि क्षेत्र । दर्शने जन उध्दरती ।। १३५ ।। नुरे देह भावासी ठाव । सर्व दशभुज सदाशिव । चरण धरोनी सद्‌भाव । वरप्रसाद मागावा ।। १३६ ।।

दीनोध्दारा दयाळा ।। दशमख विध्वंसा प्रिय त्रिदला । दाक्षायणीवरा वण्दन पदकमला । मनकामना पूर्ण कीजे ।। १३७ ।। सूर्यतीर्थ नारायण । तीर्थ मार्कण्डेय पावन । अम्मृतकुप महिमान । हे त्रिभुवनी अलभ्य असे ।।१३८।। वण्दन करोनी श्री व्यासास । सम्मत भविष्योत्तर पुराणास । सूत शौनकादि ऋषीश्वरास । स्तोत्र अर्पण शिवचरणी ।।१३९ ।। इति श्री जगमित्र विरचितं श्री वैद्यनाथ स्तोत्रं संपूर्ण

श्री वैद्यनाथ अष्टक प्रारंभ

श्री क्षेत्र कांतीपुरी वास ज्यांचा । प्रभाकरी जो नित्य असे जनांचा ।।
जे नेणती ना शिवा तेंचि व्यर्थां । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। १ ।।
वैदीक सूक्ते तुज आळविती । रुद्राभिषेकां जल धारितांती ।।
सदाशिवा उध्दरी ते भक्तां । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। २ ।।
द्यावा मला हा वर व्योमकेशी । पूजा करावी तूझी अहर्निशी ।।
करी काळ या देहासी या अनर्था । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। ३ ।।
नाही कधी ध्यान तपादिकांही । न होम संध्या कधी केलि पाही ।।
उध्दारिगां सत्वर भूतनाथा । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। ४ ।।
थकवां शरीरांशी बहुत आला । आलो नसे ना तव दर्शनाला ।।
आलस्य हारी मम प्राणनाथा । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। ५ ।।
अषूलीलता या वदलो मुखाने । उच्चारिले ना शिवनाम याने ।।
हा घातिला मी बहु काळ व्यर्था । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। ६ ।।
टवाळी नीचेशि साधूंची केली । सत्कर्म नाही कधी आचरिली
देई त्वरे सन्मति सोमनाथा । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। ७ ।।
कर्पूर गौरा कमला वरानें । अर्चियले बा कमला दलाने ।।
न्यूनासि दे नेत्रपद्माशी नाथा । तारी मला बां प्रभो वैद्यनाथा ।। ८ ।।
या अष्टके जे शिवा आळवीती । वाहे हरा कुसुम बिल्व हाती ।।
जगमित्र चित्ती तू वससी समर्था । करी पावना हे प्रभो वैद्यनाथा ।। ९ ।।

।। श्री संतश्रेष्ठ गुरुलिंग स्वामीचे अभंग ।।

अभंग १

गुरुलिंग स्वामी भोळे फार । साक्षात् प्रभुचा अवतार ।। १ ।।
साधुतत्व अंगी विदेही । शिवज्ञान काया योगीराज ।। २ ।।
सर्व जीवात पाहे सदाशिव । अवघे चराचर शिवमय ।। ३ ।।
साळुबाई म्हणे गुरुलिंग । दृष्टी पडे तेथे लिंग ।। ४ ।।

अभंग २

गुरुलिंग स्वामीचा महिमा काय वर्णु ।
करिता भाकीत मिळे इच्छा फळ ।। १ ।।
संतती तयाचे कृपे मज झाली । सेवेमाजी फळ हाती आले ।। २ ।।
धर्म अर्थ काम फलद्रूप झाले । अंति मोक्ष पंथ दाखविला ।। ३ ।।
साळुबाई सांगती सर्व जनाला ।
निष्काम भक्तीने स्वानुभव घ्यावा ।।४ ।।

अभंग ३

स्वामी गुरुलिंगाची काय सांगू लीला ।
अजब तयाची किमया काय वर्णू ।। १ ।।
ऊध्दरीले जड मूढ पामर । सहजची कृपा होईल सत्वर ।। २ ।।
न लागे काळ वेळ तयालागी । सहजची बोलणे कृपादृष्टी ।। ३ ।।
साळुबाई म्हणे दिसे वेडा भोळा ।
वसे चरणाजवळी जाश्वनीळा ।। ४ ।।

अभंग ४

वेडा गुरुलिंग आले घरा । आम्हा पुर्व संचिताचा ठेवा ॥ १ ॥

होती पुर्व पुण्याची शिदोरी । तेणे सदगुरु चरण धरी ॥ २ ॥

अज्ञानी जन म्हणती भोळा । नाही ओळखीला ज्ञानडोळा ॥ ३ ॥

साळुबाई म्हणे शोधा सत्वगुणा ।

तेणे येईल सज्ञान मना आपुलिया ॥ ४ ॥

अभंग ५

पूजेमाजी वसले असतां । प्रसन्न होई प्रभु दाता ॥ २ ॥

नागरुपात तो हा वैद्यनाथ । प्रत्यक्ष प्रगटे नागनाथ ॥ २ ॥

दूध पिऊनिया प्रसादाचे । संतोष वाटे स्वामी राजे ॥ ३ ॥

साळुबाई म्हणे झाले तृप्त । पहा इष्टलिंगाचे पूजने ॥ ४ ॥

अभंग ६

जाणे आहे मज कैलासी । द्यावी मज परवानगी ॥ १ ॥

मिटले आमुचे ऋणानुबंध । घ्यावा आमुचा एवढा निरोप ॥ २ ॥

चुकले मुकले दया करावी । लेकरु तुमचे समजा आई ॥ ३ ॥

साळुबाई म्हणे ऐसा शब्द ऐकता ।

ऱ्हदयी यातना झाल्या फार ॥ ४ ॥

अभंग ७

स्नान पूजा आरंभिली । आज्ञा वैद्यनाथासी मागीतली ॥ १ ॥

इष्टलिंगाचे करोनी पूजन । पंचलिंगा पंचप्राण अर्पून ॥ २ ॥

जीवाशिवाचे नाते जुळले । प्राणलिंग ऐक्यी नेले ॥ ३ ॥

साळुबाई म्हणे गुरुलिंग स्वामी । वैद्यनाथ चरणी स्थिरावले ॥ ४ ॥

लोकगीत ८

गुरुलिंग स्वामी होते भोळे फार । साक्षात प्रभु अवतार होऊनी गेले ।। १ ।।
शिवसंत शिवयोगी महाज्ञानी । नाही ओळखीले त्यांना गावात ।। २ ।।
भ्रमण करिती राणी सावरगावात । मठ तयाचा आई अंबिकेसमोर ।। ३ ।।
वैद्यनाथ परळी क्षेत्री आणूनी । देवी रेणुकेने त्यांना सोडीले ।। ४ ।।
भ्रमण करीती विदेही लीला । भक्त वेडा गुरुलिंग जाण भोळा ।। ५ ।।
साळुबाई घनचेकर तयाची भक्त । सेवा करी मनोभावे रात्रंदिन ।। ६ ।।
नाना लीला दाखवी योगीराज । नाना चमत्कारी करी जन ऊध्दार ।। ७ ।।
सुचना करी जन भक्तांना । जाणे आहे मला कैलासपूरीला ।। ८ ।।
गुरुलिंग स्वामी वसले पूजेला । गळ्यांत शोभती रुद्राक्ष माळा ।। ९ ।।
भस्म लावीले सर्व अंगाला । सदाशिवाचा नामगजर केला ।। १० ।।
स्वामीची मुर्ती शोभे परळीला । दिंडी मिरविली अखंड नाम घोष ।। ११ ।।
वसले समाधीत गुरुलिंग स्वामी । बेलवाडी क्षेत्र निजबोध ज्ञानी ।। १२ ।।

अभंग ९

गुरुलिंग जंगम एकत्रीत । पूजन करितां घडे पुण्य ।। १ ।।
गुरुलिंग नाम घेता वाचे । सुख वाटे जीवा रात्रंदिन ।। २ ।।
नुरे पाप ताप क्षणमात्रे । करिता भजन तयाचे की ।। ३ ।।
रामलिंग म्हणे सद्‌गुरुलिंग । सत्य जंगम तो जगी झाला ।। ४ ।।

अभंग १०

जंगम लिंगाचे प्रती स्वरुप । गुरुलिंग स्वामी शिवराज ।। १ ।।
विकार विषय वर्जिता । पंचभूतावरी करितो सत्ता ।। २ ।।
इंद्रिया निग्रह मन बंधन । सर्वची तया होती आधीन ।। ३ ।।
रामलिंग म्हणे ऐसा गुरुलिंग । जंगमरुपी परळी क्षेत्रा ।। ४ ।।

अभंग ११

राणी सावरगाव जन्मभुमी । लीला दाखविली परळी ग्रामी ॥ १ ॥
माय आदिशक्ती रेणुका देवी । तिने पाठविले वैद्यनाथ क्षेत्री ॥ २ ॥
बाप शंकर माय पार्वती । ऐसा आदेश तियेने दिला ॥ ३ ॥
रामलिंग म्हणे वैद्यनाथ । देही वैद्यनाथ धाता वैद्यनाथ ॥ ४ ॥

अभंग १२

भाद्रपद शुध्द दशमी । सोमवार दिन ऊगवला ॥ १ ॥
आज्ञा मागीतली साळुबाईला ।
जाणे आहे आम्हा कैलासीला ॥ २ ॥
आता नाही जाणे येणे लोका । मन स्थिरावले शिवपदा ॥ ३ ॥
रामलिंग म्हणे सद्गुरुलिंग । ऐसा जंगम स्वामी देखियेला ॥ ४ ॥

अभंग १३

गुरुलिंग स्वामी योगीराज । शिवयोग साधन भक्तराज ॥ १ ॥
सर्व घटी ब्रम्ह सहजची स्थिती । राजयोग महाज्ञानी ॥ २ ॥
विदेही महात्मा देहभाव नाही । मी तूं पण नसेची कांही ॥ ३ ॥
रामलिंग म्हणे महाजंगम । जन्म मरणाचा पुरविला अंत ॥ ४ ॥

अभंग १४

गुरु आणि लिंग जंगमाची सेवा । देई मज देवा जन्मोजन्मी ॥१॥
रुद्राक्षांच्या माळा भस्म लावू भाळी । हेची चंद्रमौळी देई मज ॥२॥
तीर्थ आणि प्रसाद मंत्र षडाक्षर । ध्यावू उमावर जन्मोजन्मी ॥३॥
मन्मथ शिवलिंग म्हणे आचरण । हेची अष्टावर्ण वीरशैवा ॥४॥

आरती गुरुलिंग स्वामीची

आरती गुरुलिंग स्वामीची । शिवानंद परब्रह्म सदगुरुची ।। धृ ।।

.माहेश्वर कुळी जन्म घेतला । उमादेवीसी पुत्र झाला ।।

रेणुका राणी सावरगावाला । तो ग्राम शक्तिपीठ नेमीला ।।

कैलासी शंख नाद घुमला । वीरशैवा आनंद झाला ।।

(चा.)ऐसा श्रावण शुध्द पंचमी, शिवसंत पुजीला उत्तमी,

अवतरले गुरुलिंग स्वामी ।

(चा.) भरुनी शिवरुपी, रुद्राक्ष माळ जपी, षडाक्षरी मंत्र मुखी,

ऐसी कांती सदगुरुची, पाहे भक्तजन त्यांची ।। १ ।।

करिती सतत मेरु प्रदक्षीणा । भरोनी झोळीत वृक्षपर्णा ।।

वाहती सर्व ती लिंगाना । धाव म्हणे शक्ति युक्त मदना ।।

ऐसी करुनी लिंगार्चना । वदे मम देव भवानी रमणा ।।

भजोनी ईष्ट लिंगासी । नाचती हर्ष उमारंगी । हा संत असे शिवयोगी ।

(चा.) पाहता गुरुनाथ, म्हणे महादेव भक्त, गृही चला साथ,

करती सेवा दंपत्ती, वंदुनी चरण कमल त्यांची ।। २ ।।

अंगी वर्तन बालकाचे । मुखी नाम सदाशिवाचे ।

पुजेला येती नागराजे । नैवेद्य दुधाचा पाजे ।

करिती भ्रमण नगराचे । दाखवी सगुण वेडाचे ।

(चा.) चला बोले कैलासी । पाहता संसाराचा वासी ।

पण हे जग माया सहवासी ।

भाद्रपद शुध्द दशमी, सोमवार माध्यान्ही, शिव ऐक्य स्वामी

ऐसा सिध्द कोटीत नाही, वंदे रामलिंग पद त्याचे ।। ३ ।।

अभंग

चला कपिलाधारी जाऊ । नाम मन्मथ मन्मथ घेऊ ।।धृ.।।

वीरशैव आमुचा धर्म । जाणुनि तयाचे वर्म ।

हे शिकविले आचरण । चला त्याच मार्गाने जाऊ ।।१।।

शिकविला धडा ज्ञानाचा । धर्म आचरण करण्याचा ।

दिला प्रसाद परमरहस्याचा । अनुभवातून घेऊ ।।२।।

गुरू आणि लिंग जंगम । रूद्राक्ष भस्म धारण ।

हे शिकविले आचरण । चला त्याच मार्गाने जाऊ ।।३।।

ही पूज्य परायण मूर्ति । अवतरली वीरशैवासाठी ।

त्यानी केली धर्म जागृती । चला त्याच मार्गाने जाऊ ।।४।।

अभंग - भक्तीगीत

भगवान तुम्हारे चरणोंमें । मैं भक्ती भावसे आया हूँ ।।धृ.।।

तुम्हे नहाने के लिये । मैं निर्मल गंगा लाया हूँ ।।१।।

तुम्हे लगाने के लिये । मैं पवित्र भस्मगंध लाया हूँ ।।२।।

त्रिजन्म पाप नाशनके लिये । मैं अक्षद बिल्वपत्र लाया हूँ ।।३।।

मनानंद की चंपक माला । मैं अर्पण करणे लाया हूँ ।।४।।

आत्म प्रकाशन के लिये । मैं धूप दीप लाया हूँ ।।५।।

विषय वासना नाशन के लिय । मैं सुवर्ण दक्षिणा लाया हूँ ।।६।।

संकट नाशन के लिये । मैं घंटा नाद करता हूँ ।।७।।

विश्वशांति के लिये । मैं पंचामृत भोजन लाया हूँ ।।८।।

नम्र भावसे भजता हूँ । मैं तुमसे वर मुक्ती चाहता हूँ ।।९।।

भगवान तुम्हारे चरणोंमे । मैं भक्ती भावसे आया हूँ ।।१०।।

॥ लिंगाष्टकम् ॥

ब्रह्ममुरारि सुरार्चितलिंगं   निर्मलभसित सुशोभितलिंगं ।
जन्मजदुःख विनाशकलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥१॥

देवमुनि प्रवरार्चितलिंगं   कामदहन करुणाकरलिंगं ।
रावणदर्प निवारकलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥२॥

शुद्धसुगन्ध सुलेपितलिंगं   बुद्धिविवर्धन कारणलिंगं ।
सिद्धसुरासुर वंदितलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥३॥

दक्षकुयज्ञ विनाशकलिंगं   कनकमहामणि भूषितलिंगं ।
फणिपतिवेष्टित शोभितलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥४॥

कुंकुमचन्दन लेपितलिंगं   पंकजहार सुशोभितलिंगं ।
संचितपाप विनाशकलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥५॥

देवगणावलि सेवितलिंगं   भावविवर्धन कारणलिंगं ।
दिनकरकोटि प्रभाकरलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥६॥

अष्टदलैः परिवेष्टितलिंगं   सर्व समुद्भवकारणलिंगं ।
अष्टदरिद्र विनाशकलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥७॥

सुरगुरुसुरवर पूजितलिंगं   सुरवनपुष्प समर्चितलिंगं ।
परात्परं परमात्मकलिंगं   तत्प्रणमामि सदाशिवलिंगं ॥८॥

लिंगाष्टकमिदं पुण्यं यः   पठेच्छिवसन्निधौ ।
शिवलोकमवाप्नोति   शिवेन सह मोदते ॥

।। शिव शरणाष्टक।।

शिवहरशंकर गौरीशं, वन्दे गंगाधरमीशम् ।
रुद्रं पशुपतिमीशानं कलये काशीपुरनाथम् ।।१।।

विश्वेश तवशरणं शिव विश्वनाथा तवशरणम् ।
भाललोचना परमानन्दा नीलकण्ठा तवशरणम् ।।२।।

गौरीश तवशरणं शिव गौरीनाथा तवशरणम् ।
नन्दिवाहना नागभूषणा चन्द्रशेखरा तवशरणम् ।।३।।

वीरेश तवशरणं शिव वीरविक्रमा तवशरणम् ।
विष्णुवल्लभ विरुपमलोचन विशालभाल तवशरणम् ।।४।।

भूतेश तवशरणं शिव भूतिधारक तवशरणम् ।
भवभयमोचक भीमपराक्रम भुजंगभूषा तवशरणम् ।।५।।

पतितपावन तवशरणं शिव पतितोद्धारक तवशरणम् ।
परात्पर पार्वतीप्रिय पुराणपुरुष तवशरणम् ।।६।।

करुणानिधे तवशरणं शिव करुणासागर तवशरणम् ।
कामविदारक कलिमलनाशक कपालमाल तवशरणम् ।।७।।

निजानंदा तवशरणं शिव निजपददायक तवशरणम् ।
नित्य निरंजन निरुपमरूपा निखिलानन्द तवशरणम् ।।८।।

मायाविरहित तवशरणं शिव मायातारक तवशरणम् ।
मायाजलनिधि मग्नममांकित मायापालक तवशरणम् ।।९।।

***

।। शिवमानसपुजास्तोत्रं ।।

रत्नैः कल्पितमासनं हिमजलैः स्नानं च दिव्यांबरं ।
नानारत्नविभूषितं मृगमदा मोदांकितं चंदनं ।।
जातीचंपक बिल्वपत्र रचितं पुष्पं च धूपं तथा ।
दीपं देव दयानिधे पशुपते हृत्कल्पितं गृह्यतां ।। १ ।।
सौवर्णे नवरत्नखंडरचिते पात्रे घृतं पायसं ।
भक्ष्यं पंचविधं पयोदधियुतं रंभाफलं पानकं ।।
शाकानामयुतं जलं रुचिकरं कर्पूरखंडोज्वलं ।
तांबूलं मनसामया विरचितं भक्त्या प्रभो स्वीकुरु ।। २ ।।
छत्रं चामरयोर्युगं व्यजनकं चादर्शकं निर्मलं ।
वीणा भेरि मृदंग काहलकला गीतं च नृत्यं तथा ।।
साष्टांग प्रणति स्तुतिर्बहुविधा म्हेतत्समासन्मया ।
संकल्पेन समर्पित तव विभो पूजां गृहाणः प्रभो ।। ३ ।।
आत्मा त्वं गिरिजामतिः सहचराः प्राणाःशरीरं गृहं ।
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ।।
संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वागिरो ।
यद्यत्कर्म करोमिः तत्दखिलं शंभो तवाराधनं ।। ४ ।।
करचरणकृतं वा कायजं कर्मजं वा ।
श्रवणनयनजं वा मानसंवापराधंम ।।
विहितमं विहितमं वा सर्वमेतत् क्षमस्व ।
जय जय करुणाब्धे श्रीमहादेव शंभो ।। ५ ।।

संकल्प

ॐ अस्य श्री शिव पंचाक्षरी महामंत्रस्य वामदेव ऋषीः

पंक्ती छंदः श्री शिव सांब सदाशिव देवता नं बीजं

उमाशक्तीः श्री शिव सांब सदाशिव देवताप्रसाद

सिध्दीव्दारा लिंगअंग सामरस्ये जपे विनीयोगः

॥ न्यास ॥

ॐ श्री वामदेव ऋषिये नमः शिरसे

ॐ पंक्ती छंदसे नमः मुखे

ॐ श्री सांब सदाशिव देवताय नमः हृदये

ॐ नं बीजाय नमः गुहये

ॐ उमाशक्तये नमः पादयोह

ॐ विनियोगाय नमः सर्वांगे

॥ करन्यास ॥

ॐ नं अंगुष्ठाभ्यां नमः । ॐ मं तर्जनीभ्यां नमः

ॐ शिं मध्यमाभ्यां नमः । ॐ वां अनामीकाभ्यां नमः

ॐ यं कनिष्ठीकाभ्यां नमः । ॐ ॐ करतलकरप्रष्ठाभ्यां नमः

॥ ध्यान ॥

शुध्द स्फटिक संकाशं । शुध्द विद्या प्रदायकं ॥

शुध्द पुर्ण चिदानंद । सदाशिवमहंभजे ॥

संक्षिप्त शिवपूजाविधीः

वीरशैवांनी प्रति दिवशी निजते वेळी श्रीजगदगूरूपंचाचार्य मां रक्षत असे म्हणून गुरूध्यान करून निजावे. पुन्हा प्रातःकाळी उठताच इष्टलिंगास नमस्कार करून, निश्चल मनाने गुरूध्यान करावे. तदनंतर शौचादी क्रिया आटोपून, दंतधावन करून, खालील मंत्र म्हणत निर्मळ पाण्याने स्नान करावे.

पुनंतु मा देवजनाः पुनंतु मनसाधियः ।
पुनंतु विश्वाभूतानि जातवेदः पुनीहि मा ।।

असा मंत्र म्हणून स्नान करावे. त्या नंतर सोवळे अगर सोवळ्यातील धूत वस्त्र नेसून शिवपूजा करावयाचे घरापर्यंत पाणी शिंपडीत जावे. त्यानंतर।। ॐ सर्वज्ञाय नमः ।। असा मंत्रोच्चार करीत शिवपूजा गृहात प्रवेश करावा. नंतर आसनाची पूजा करून,

पृथ्वी त्वया धृता लोका देवि त्वं विष्णुना धृता ।
त्वं च धारय मां देवि पवित्रं कुरू चासनम् ।।

असा मंत्र म्हणून आसनावर, पूर्वेकडे अगर उत्तरेकडे तोंड करून बसावे. तदनंतर आचमन करून एका फुलपात्रात गाळलेले पाणी भरून घेऊन त्यावर ॐ असा प्रणव लिहून,

गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वति ।
नर्मदे सिंधु कावेरि जले स्मिन सन्निधिं कुरू ।।

ह्या मंत्राने अभिमंत्रून त्या मंत्रोदकाने शिवपूजेची सर्व सामग्री प्रोक्षण करावी (म्हणजे पूजेच्या सर्व सामानावर पाणी शिंपडावे) नंतर–

अपसर्पन्तु ये भूता ये भूता भुवि संस्थिताः ।
ये भूता विन्घकार्तारस्ते नश्यन्तु शिवज्ञया ।।

हा मंत्र म्हणत दाही दिशांस पाणी शिंपडावे. तदनंतर शिखेस(शेंडीस) गाठ देऊन मग ताठ बसून ॐ शिवाय नमः, ॐ शंकराय

नमः, ॐ महेश्वराय नमः असे म्हणत तीन वेळा आचमन करून प्रणायाम करावा.

॥ गुरूध्यानम ॥

ॐ पंचानन तनूदभूतान पंचाक्षरमनूपमान ।
पंचसूत्रकृतो वंदे पंचाचार्यान जगदगुरून ॥

॥ शिवध्यानम् ॥

ॐ ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरीनिभं चारुचंद्रावतंसं ।
रत्नाकल्पोज्ज्वलांग परशुमृग वराभीतिहस्तं प्रसन्नम् ।
पद्मासीनं समंतास्तुतमं मरगणैर्व्याघ्रकृतिं वसानं ।
विश्वाद्यं विश्ववंद्यं निखिलभयहरं पंचवक्त्रं त्रिनेत्रम ॥

याप्रमाणे ध्यान केल्यावर प्रणवाचा उच्चार करीत कुरंगमुद्रेने(अंगुष्ठ , अनामिका,मध्यमा ह्या तीन बोटांनी,) भस्म घेऊन, डाव्या हाताच्या तळव्यावर ठेवून,बिल्वादिके अर्पण करून पूजा करावी आणि दोन्ही हातांस भस्म लावून अंगुष्ठादी पंचांगुलीवर “य” करादी “न” कारांत पंचाक्षरीमंत्र उच्चारीत भस्मन्यास करावा.

व खालील मंत्र म्हणुन त्या त्या स्थानापूडे लिहीलेले मंत्र म्हणत त्रिपुंड्र धारण करावे.

	त्रिपुंड्र धारणेची स्थाने	मंत्र
१.	मस्तकावर	ॐ शिवाय नमः
२.	कपाळावर	ॐ महेश्वराय नमः
३–४	दोन्ही कानावर	ॐ रूद्राय नमः
५.	कंठाचे ठायी	ॐ श्रीकंठाय नमः
६–७	दोन्ही भुजांवर	ॐ शंभवे नमः
८.	हृदयावर	ॐ ईश्वराय नमः

९.	नाभीवर	ॐ महादेवाय नमः
१०.	पाठीवर	ॐ पशुपतये नमः
११-१२	दोन्ही कोपरांवर	ॐ शंकराय नमः
१३.	खांद्यावर	ॐ वृषभध्वजाय नमः
१४-१५	दोन्ही मनगटांवर	ॐ परमात्मने नमः

याप्रमाणे १५ स्थानांवर त्रिपुंड्र धारण केल्यानंतर रूद्राक्षांची पत्रपुष्पादिकांनी पूजा करून,खालील मंत्र म्हणुन लिंगावर अभिषेक करावा.

अभिषेक मंत्र

ॐ नमः सोमाय च रूद्राय च नमस्ताम्राय च अरूणाय च नमः शङ्गाय च पशुपतये च नम उग्राय च भीमाय च नमो अग्रेवधाय च दूरेवधाय च नमो हन्त्रे च हनीयसे च नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यो नमस्ताराय नमः शम्भवे च मयोभवे च नमःशङ्कराय च मयस्कराय च नमः शिवाय च शिवतराय च नमस्तीर्थ्याय च कूल्याय च नमः पार्याय च अवार्याय च नमः प्रतरणाय च उत्तरणाय च नम आतार्याय च चा लाद्याय च नमः शष्प्याय च फेन्याय च नमः सिकत्याय च प्रवाह्याय च ।। ॐ शांती : शांती : शांती :

(अभिषेकानंतर इष्टलींगाची खालील उपचारांनी पूजा करावी)

।। भस्मधारणमंत्रः ।।

अनादि शाश्वतं शांतं चैतन्यं चित्स्वरूपकम् ।
चिदंगं वृषभाकारं चिद्भस्म लिंगधारणम्।।
श्रीसांबसदाशिव नमः विभूतिं धारयामि ।

।। गंधधारणमंत्रः ।।

परमानंद सौरभ्यं परिपुर्ण दिगंतरम् ।
गृहाण परमं गंधं कृपया परमेश्वर ।।

श्रीसांबसदाशिवाय नमः गंधं धारयामि ।

(अनामिका बोटाने गंध लावावे)

।। अक्षतधारणमंत्रः ।।

अक्षतान् धवलान् दिव्यां स्तिलतंडुल मिश्रितान् ।
अर्पयामि महाभक्त्या प्रसीद परमेश्वर ।।

श्रीसांबसदाशिवाय नमः अक्षतान् धारयामि ।

(अक्षताही अनामिकेने वाहाव्यात.)

।। बिल्वपत्रधारणमंत्रः ।।

त्रिदलं त्रिगुणाकारं त्रिनेत्रं च त्रियायुधम् ।
त्रिजन्मपापसंहारमेकबिल्वं शिवार्पणम् ।।

श्री सांबसदाशिवाय नमः बिल्वपत्राणि धारयामि ।

(बिल्वपत्रे मध्यमा व अनामिका ह्या दोन बोटांनी अधोमुख करून वाहावी.)

।। पुष्पधारणमंत्रः ।।

तुरीयवनसंभूतं नानागुणसमन्वितम् ।
आनंदसौरभं पुष्पं गृह्यतामिदमुत्तमम् ।।

श्रीसांबसदाशिवाय नमः नानाविधपुष्पाणि समर्पयामि । (पुष्पे मध्यमा–अनामिका ह्या दोन बोटांनी उर्ध्वमुख करून वाहावी.)

।। धूपमंत्रः ।।

वनस्पतिरसोपेतो गंधाढ्यो धूप उत्तमः ।
आघ्रेयः सर्वदेवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम् ।।

श्रीसांबसदाशिव नमः धूपमाघ्रापयामि ।

॥ दीपमंत्रः ॥

स्वप्रकाश महादेवः सर्वांतस्तिमिरापहः ।
सबाह्याभ्यंतरं ज्योतिर्दीपोऽयं प्रतिगृह्यताम् ॥
श्रीसांबसदाशिवाय नमः दीपं नीराजयामि ।

॥ कर्पूरदीपमंत्रः ॥

कर्पूरतिर्मितं दिपं स्वर्णपात्रे निवेशितम् ।
नीराजितं मया भक्त्या गृहाण परमेश्वर ॥
श्रीसांबसदाशिवाय नमः कर्पूरदीपं नीराजयामि ।

॥ नैवेद्यमंत्रः ॥

नैवेद्यं षड्रसोपेत नानाभक्ष्यसमन्वितम् ।
दधिक्षीरघृतोपेतं नैवेद्यं प्रतिगृह्यताम् ॥
श्रीसांबसदाशिवाय नमः नैवेद्यं निवेदयामि,
नैवेद्यान्ते पानीयं समर्पयामि ।

॥ घंटानादमंत्रः ॥

आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।
कुर्वे घंटारवं नित्यं सर्वोपद्रवनाशनम् ॥
श्रीसांबसदाशिवाय नमः घंटानादं श्रावयामि ।

॥ पुष्पांजलिमंत्रः ॥

हरॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणिप्रथमान्यासन् ।
तेहनाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥
श्रीसांबसदाशिवाय नमः पुष्पांजलिं समर्पयामि ।

॥ प्रदक्षिणामंत्रः ॥

प्रकृष्टपापनाशाय प्रकृष्टफलसिध्दये ।
प्रदक्षिणं करोमीश प्रसीद परमेश्वर ॥

श्रीसांबसदाशिवाय नमः प्रदक्षिणं करोमि ।

॥ नमस्कारमंत्रः ॥

नमः शिवाय शान्ताय नमः सोमाय शंभवे ।
नमः शिवाय कल्याणीपतये ते नमो नमः ॥

श्रीसांबसदाशिवाय नमः नमस्कारं करोमि ।

॥ स्तोत्रम् ॥

हर शंभो महादेव विरूपाक्ष त्रिलोचन ।
दयासिन्धो दीनबन्धो रक्ष रक्ष महेश्वर ॥
मायासमुद्रपतितं अनन्तकलुषान्वितम् ।
मामुद्धर महेशान भक्तवत्सल शंकरं ॥

अशी स्तुती करीत इष्टलिंगाचे ठायी दृष्टी ठेवून निर्मळ मनाने गुरूने उपदेशिलेला मंत्र एक हजार वेळ अगर एकशेआठ वेळा जपावा. तदनंतर शिवपादोदकाचा स्वीकार करावा.

॥ तीर्थस्वीकारमंत्रः ॥

ऋतँ सत्यं परं ब्रह्म पुरुषं कृष्णपिंगलम् ।
ऊर्ध्वरेतं विरूपाक्षं विश्वरूपाय वै नमो नमः ॥

अकाल मृत्यु हरणम् सर्व व्याधि विनाशनम् ।
गुरूपादोदकं तीर्थं जठरे धारम्याहम् ॥

श्रीसांबसदाशिवाय नमः तीर्थ स्वीकारोमि ।

शिवलिंगतीर्थ स्वीकार केल्यावर पुन्हा शिवलिंगाची संक्षेपाने बिल्वादिकाने पूजा करावी व पूजनयुक्त असे ते इष्टलिंग तसेच लिंगाकारात ठेवावे.

।। श्री शिवस्तुति ।।

।। श्री गणेशाय नमः।। ।। श्री सरस्वतेय नमः।। ।। श्री गुरुभ्यो नमः।।

कैलासराणा शिव चंद्रमौळी ।। फणींद्र माथां मुकुटीं झळाळी ।। कारुण्यसिंधू भवदुःखहारी ।। तुजवीण शंभो मज कोण तारी ।। १ ।। रविंदु दावानल पूर्ण भाळीं ।। स्वतेजनेत्रीं तिमिरौघ जाळी ।। ब्रह्मांडधीशा मदनांतकारी ।। तुज ०।। २ ।। जटा विभूती उटि चंदनाची ।। कपालमाला प्रित गौतमीची ।। पंचानना विश्वनिवांतकारी ।। तुज ० ।। ३ ।। वैराग्ययोगी शिव शुळपाणी ।। सदा समाधी निजबोधवाणी ।। उमानिवासा त्रिपुरांतकारी ।। तुज ० ।। ४ ।। उदार मेरु पति शैलजेचा ।। श्री विश्वनाथ म्हणती सुरांचा ।। दयानिधी जो गजचर्मधारी ।। तुज ० ।।५।। ब्रम्हादि वंदी अमरादिनाथ ।। भुजंगमाला धरि सोमकांत ।। गंगा शिरीं दोष महा विदारी ।। तुज ० ।।६ ।। कर्पुरगौरी गिरिजा विराजे ।। हळाहळें कंठ निळाचि साजे ।। दारिद्र्य दुःखे स्मरणें निवारी ।। तुज ० ।। ७ ।। स्मशानक्रीडा करितां सुखावे ।। तो देवचूडामणि कोण आहे ।। उदासमूर्ती जटाभस्मधारी ।। तुज ० ।। ८ ।। भूतादिनाथ अरि अंतकाचा ।। तो स्वामि माझा ध्वज शांभवाचा ।। राजा महेश बहुबाहुधारी ।। तुज ० ।।९ ।। नंदी हराचा हरनंदिकेश ।। श्रीविश्वनाथ म्हणती सुरेश ।। सदाशिव व्यापक तापहारी ।। तुज ० ।। १०।। भयानक भीम विक्राळ नग्न ।। लीलाविनोदें करि काम भग्न ।। तो रुद्र विश्वंभर दक्ष मारी । तुज ० ।। ११ ।। इच्छा हराची जग हें विशाळ । पाळी रची तो हरि ब्रह्मगोळ । उमापती भैरव विघ्नहारी । तुज ० ।।१२।। भागीरथीतीर सदा पवित्र । जेथें असे तारक ब्रह्ममंत्र । विश्वेश विश्वंभर त्रिनेत्रधारी । तुज ० ।।१३।। प्रयाग वेणी सकळा हराच्या । पदारविंदीं वहाती हरीच्या । मंदाकिनी मंगल मोक्षकारी । तुज ० ।। १४ ।। कीर्ती हराची स्तुति बोलवेना । कैवल्यदाता

विष अंगिकारी । तुज ० ।।१५ ।। सर्वांतरीं व्यापक जो नियंता । तो प्राणलिंगाजवळी महंता । अंकीं उमा ते गिरिरुपधारी । तुज ० ।।१६।। सदा तपस्वी असे कामधेनू । सदा सतेज शतकोटिभानू । गौरीपती जो सदा भस्मधारी । तुज ० ।।१७।। कर्पूरगौरा स्मरल्या विसांवा । चिंता हरी जो भजकां सदैवा । अंतीं स्वहित सुचना विचारी । तुज ० ।।१८।। विरामकाळीं विकळ शरीर । उदास चित्तीं न धरीच धीर । चिंतामणी चिंतनें चित्तहारी । तुज ० ।।१९।। सुखावसानें सकळें सुखार्ची । दुःखावसानें टळती जगाचीं । देहावसानीं धरणी थरारी । तुज ० ।।२०।। अनुहतशब्द गगनीं न माय । त्याचेनि नादे भव शून्य होय । कथा निजांगें करुणाकुमारी । तुज ० ।।२१।। शांतीस्वलीला वदनीं विलासे । ब्रह्मांगोळीं असुनी न दिसे । भिल्ली भवानी शिव ब्रह्मचारी । तुज ० ।।२२।। पीतांबरें मंडित नाभि ज्याची । शोभा जडीत वरि किंकिणीची । श्रीदेव दत्त दुरितांतकारी । तुज ० ।।२३।। जीवा शिवांची जडली समाधी । विटला प्रपंच तुटली उपाधी । शुध्द स्वरें गर्जति वेद चारी । तुज ० ।। २४।। निधानकुंभ भरला अभंग । पहा निजांगें शिव ज्योतिर्लिंग । गंभीर धीर सुरचक्रधारी । तुज ० ।।२५।। मंदार बिल्वें बकुलें सुवासी । माला पवित्र वाहा शंकरासी । काशीपुरीं भैरव विश्व तारी । तुज ० ।।२६।। जाई जुई चंपक पुष्पजाती । शोभे गळां मालति माळ हातीं । प्रतापसूर्य शरचापधारी । तुज ० ।।२७।। अलक्ष्यमुद्रा श्रवणीं प्रकाशे । संपूर्ण शोभा वदनीं विकासे । नेई सुपंथें भवपैलतीरीं । तुज० ।।२८।। नागेशनामा सकळां जिव्हाळा । मना जपें रे शिवमंत्रमाळा । पंचाक्षरी ध्यान गुहाविहारी । तुज ० ।।२९।। एकांतिं ये रे गुरुराजस्वामी । चैतन्यरुपीं शिव सौख्यनामीं । शिणलों दयाळा बहुसाल भारी । तुज ० ।।३०।। शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थासि जाऊं नको । योगाभ्यास नको व्रतें मखे नको तीव्र तपें तीं नको । काळाचे भय मानसी धरु नको । दुष्टाची शंकू नको । ज्याचीया स्मरणें पतीत तरती तोशंभु सोडूं नको ।।३१।।

नित्यपाठाच्या बेचाळीस ओव्या

।। श्री गणेशाय नमः।। ।। श्री सरस्वतेय नमः।। ।। श्री गुरुभ्यो नमः।।

ॐ नमोजी शिवा अपरिमिता । आदि अनादि मायातीता । पूर्ण ब्रह्मानंदा शाश्वता । हेरंबताता जगद्गुरु ।।१।। ज्योर्तिमयस्वरुपा पुराणपुरुषा । अनादिसिध्दा आनंदवनविलासा । मायाचक्रचाळका अविनाशा । अनंतवेषा जगत्पते ।।२।। जय जय विरुपाक्षा पंचवदना । कर्माध्यक्षा शुद्धचैतन्या । मनोज दमना मनमोहना । कर्मामोचका विश्वंभरा ।।३।। जेथें सर्वदा शिवस्मरण । तेथें भुक्ति मुक्ति आनंद कल्याण । नाना संकटें विघ्नें दारुण । न बाधती कालत्रयीं ।।४।। संकेते अथवा हास्येंकरुन । भलत्या मिषें घडो शिवस्मरण । न कळता परिस लोहालागून । झगटता सुवर्ण करीतसे ।।५।। न कळतां प्राशितां अमृत । अमर काया होय यथार्थ । औषध नेणतां भक्षीत । परी रोग हरे तत्काळ ।।६।। जय जय शिव मंगलधामा । निजजनतारक आत्मारामा । चराचर फलांकित कल्पद्रुमा । नामा अनामा अतीता ।।७।। हिमाचलसुता मनरंजना । स्कंदजनका शफरीध्वजदहना । ब्रह्मानंदा भाललोचना । भवभंजना महेश्वरा ।। ८ ।। हे शिवा वामदेवा अघोरा । ततूपुरुषा ईशाना ईश्वरा । अर्धनारीनटेश्वरा । गिरिजारंगा गिरीशा ।।९।। धराधरेंद्र मानससरोवरीं । तूं शुध्द मराळ क्रीडसी निर्धारीं । तव अपार गुणांसी परोपरी । सर्वदा वर्णिती आम्नाय ।।१०।। न कळे तुझें आदिमध्यावसान । आपणचि सर्व कर्ता कारण । कोठें प्रकटशी याचें अनुमान । ठायीं न पडे ब्रह्मादिकां ।।११।। जाणोनि भक्तांचें मानस । तेथेंचि प्रकटसी जगन्निवास । सर्व काळ भक्तकार्यास । स्वांगें उडी घालिसी ।।१२।। सदाशिव हीं अक्षरें चारी । सदा उच्चारी ज्याची वैखरी । तो परम पावन संसारीं ।

होऊनि तारी इतरांतें ।।१३।। बहुत शास्त्रवक्ते नर । प्रायश्चित्तांचा करिती विचार । परी शिवनाम एक पवित्र । सर्व प्रायश्चित्तां आगळें ।।१४।। नामाचा महिमा अद्‌भुत । त्यावरी प्रदोषव्रत आचरत । त्यांसी सर्व सिध्दी प्राप्त होत । सत्य सत्य त्रिवाचा ।।१५।। जयजयाजी पंचवदना । महापापद्रुम निकृंतना । मदमत्सर - काननदहना । निरंजना भवहारका ।।१६।। हिमाद्रिजामाता गंगाधरा । सुहास्यवदना कर्पूरगौरा । पद्मनाभमनरंजना त्रिनेत्रा । त्रिदोषशमना त्रिभुवनेशा ।।१७।। नीलग्रीवा अहिभूषणा । नंदीवाहना अंधकमर्दना । दक्षप्रजापति मखभंजना । दानवदमना दयानिधे ।।१८।। जय जय किशोरचंद्रशेखरा । उर्वीधरेंद्रनंदिनीवरा । त्रिपुरमर्दना कैलासविहारा । तुझ्या लीला विचित्र ।।१९।। कोटिभानुतेजा अपरिमिता । विश्वव्यापका विश्वनाथा । समाधिप्रिया भूतादिनाथा । मूर्तामूती त्रयीमूर्ते ।।२०।। परमानंदा परमपवित्रा । परात्परा पंचदशनेत्रा । पशुपते पयःफेनगात्रा । परममंगला परब्रह्मा ।।२१।। जय जय श्रीब्रम्हानंदमूर्ती । तूं वेदवंद्य भोळा चक्रवर्ती । शिवयोगीरुपें भद्रायूप्रती । अगाध नीती कथिलीस ।।२२।। जय जय भस्मोध्दूलितांगा । योगीध्येया भक्तभवभंगा । सकलजन आराध्यलिंगा । नेई वेगीं तुजपाशीं ।।२३।। जेथें नाही शिवाचें नाम । तो धिक् ग्राम धिक् आश्रम । धिक् गृह पूर उत्तम । आणि दानधर्मा धिक्कार ।।२४।। जेथें शिवनामाचा उच्चार । तेथें कैंचा जन्ममृत्युसंसार । ज्यांसी शिव शिव छंद निरंतर । त्यांहीं जिंकिले कळिकाळा ।।२५।। जयाची शिवनामीं भक्ती । तयाचीं पापें सर्व जळती । आणि चुके पुनरावृत्ती । तो केवळ शिवरुप ।।२६।। जैसें प्राणियाचें चित्त । विषयीं गुंते अहोरात । तैसें शिवनामी जरी लागत । तरी मग बंधन कैंचें ।।२७।। कामगजविदारक पंचानना । क्रोधजलद-विध्वंसप्रभंजना ।

लोभांधकार चंडकिरणा । धर्मवर्धना दशभुजा ।।२८।। मत्सरविपिनकृशाना । दंभनगभेदका सहस्त्रनयना । लोभमहासागरशोषणा । अगस्त्य महामुनिवर्या ।।२९।। आनंद कैलासविहारा । निगमागमवंद्या दीनोध्दारा । रुंडमालांकितशरीरा । ब्रह्मानंदा दयानिधे ।।३०।। धन्य धन्य तेचि जन । शिवभजनीं जे परायण । सदा शिवलीलामृत पठण । किंवा श्रवण करिती पैं ।।३१।। सूत सांगे शौनकादिकांप्रति । जे भस्मरुद्राक्षधारण करती । त्यांच्या पुण्यासी नाही गणती । त्रिजगती तेची धन्य ।।३२।। जे करीती रुद्राक्ष धारण । त्यांसी वंदिती शक्रद्रुहिण । केवळ तयांचें घेतां दर्शन । तरती जन तत्काळ ।।३३।। ब्राह्मणादि चारी वर्ण । ब्रह्मचर्यादि आश्रमीं संपूर्ण । स्त्री बाल वृध्द आणि तरुणा । यांहीं शिवकीर्तन करावें ।।३४।। शिवकीर्तन नावडे अणुमात्र । ते अंत्यजाहूनि अपवित्र । लेइले नाना वस्त्रालंकार । तरी ते केवळ प्रेतचि ।।३५।। जरी भक्षिती मिष्टान्न । तरी ते केवळ पशूसमान । मयूरांगींचें व्यर्थ नयन । तैसे नेत्र तयांचे ।।३६।। शिव शिव म्हणतां वाचें । मूळ न राहे पापाचें । ऐसें माहात्म्य शंकराचें । निगमागम वर्णिती ।।३७।। जो जगद्गुरु ब्रह्मानंद । अपर्णाहृदयाब्जमिलिंद । शुध्द चैतन्य जगदादिकंद । विश्वंभर दयाब्धी ।।३९।। जो पंचमुख पंचदशनयन । भार्गववरद भक्तजीवन । अघोर भस्मासुरमर्दन । भेदातीत भूतपती ।।४०।। तो तूं स्वजन भद्रकारका । संकटीं रक्षिसी भोळेभाविका । ऐसी कीर्ति अलौकिका । गाजतसे ब्रह्मांडीं ।।४१।। म्हणोनि भावें तुजलागून । शरण रिघालों असें मी दीन । तरी या संकटांतून । काढूनी पूर्ण संरक्षी ।।४२।। इति श्री शिवलीलामृत ग्रंथ प्रचंड । स्कंदपुराण ब्रम्होत्तर खंड । परिसोत सज्जन अखंड । बेचाळीस ओव्या समाप्त ह्या ।

आरती लिंगाची

आरती ओवाळू लिंगासी । सोहं ज्योती प्रकाशी ।। धृ ।।
लिंग सद्गुरुने मज दिधला, शिवमंत्र स्थापीला ।
निराकार तो आकारिला, मुळ मार्ग दावीला ।। १ ।।
भस्म त्रिपुंड, चर्चिली, पूजा आरंभिली ।
त्रिदल बिल्वपत्रे बाहीली, सारांशे निवडीली ।। २ ।।
मंत्र दिधला षडाक्षरी, शिवपंचाक्षरी ।
सोहं शब्द तो ओंकारी, सद्गुरु परऊपकारी ।। ३ ।।
आत्मलिंग तो कोण्याठायी, एवढी खूण ओळखावी ।
धन्य त्या प्रभुची चतुराई, सद्गुरु घरची ठेवी ।।४।।
ज्योति मिळाल्या कर्पुर, अवघा लिंगाकार ।
गुरुलिंग स्वामी तो निरंतर, नाना पदवीकार ।। ५ ।।

आरती कर्पूरगौराची

कर्पुरगौरं करुणावतारं । संसारसारं भुजगेंद्र हारं ।
सदावसंतं हृदयारविन्दें । भवंभवानी सहितं नमामि ।। १ ।।
गुणातीत कांतं परब्रह्मशांत । सुविद्यादिदेवं भवारण्य दाहं ।। २ ।।
उमानाथ मीशं जरा जन्मनाशं । स्वयंज्योतिर्लिंग नमामीष्टलिंग ।
महादेव देवं महापापनाशं । चिताभस्मलिंग नमामि विश्वनाथं ।
जय मंगल जय नमः ।
पार्वती पते शिव हरहर महादेव ।।

।। आरती पलसिध्द महास्वामींची ।।

आरती सिध्दराया । दीनबंधु गुरुराया ।।धृ।।
सिध्दयोग रे साधीला । स्वस्थ झालासी दयाळा ।
प्रभू स्वामी रे निर्मळा । गळा शोभती माळा ।।१।।
सत्यरुप तू रे देवा । परब्रह्म कृपाळूवा ।
योगीयांचा तू रे राव । जगन्नाथ तू रे देवा ।।२।।
रत्नमय पादूकारे । पायी शोभती त्या रे ।
रवी शशी लोपले रे । ऐसे तुझे ते पद रे ।।३।।
भाळी तो त्रिपूंड्र रे । सर्वांगी विभूती रे ।
पीतांबर शोभे तू ते । निरपेक्ष तू योगी रे ।।४।।
काषाय ते वस्त्र तू ते । शोभतसे कृपावंते ।
महावस्त्र शोभे तू ते । सर्वमान्य तू गे माते ।।५।।
ब्रह्मांड हे राज्य वमन । मानीसी तू परिपूर्ण ।
अलक्ष तू निरंजन । चरणापाशी लक्ष्मण ।।६।।

आरती शिवसंत लक्ष्मण महाराजांची

आरती लक्ष्मणा । स्वामी सद्गुरू धामा ।
सच्चिदानंद मूर्ती । पाय दाखवी आम्हा ।।धृ. १।।
कलिमाजी अवतार । घेऊनिया भूमीवर ।
सिद्ध आश्रमी सत्वर । योग साधीला थोर ।।२।।
पूढे आशापुर ग्रामी । रहिवास केला तुम्ही ।
तेथील जन नामस्मरणी । अज्ञानाचे केले ज्ञानी ।।३।।
लिंग नाम सिद्धेश्वर । आहे अनादि ईश्वर ।
यात्रा येथे भरते फार । सदा होते जय जय कार ।।४।।
खंडेश्वर लिंग नाम । समीप नंदीनी सुगम ।
पुर्वतटी समाधी घेवून । दासा देतो वरदान ।।५।।

आरती भीमाशंकराची

आरती भीमाशंकरा । ज्योतिर्लिंग परात्परा ।
ओवाळीतो कर्पूरशिवगौरा । भीमाशंकरा ।।धृ।।
भक्ता सोडूनी बहु दूर । मंदिर तुझे दरी खोर ।
सत्व पाहसी खरोखर । भीमाशंकरा ।।१।।
भीमा निघुनी तुझे चरणी । पावन करीसी सर्व धरणी ।
करणी आहे तुझी न्यारी । भीमाशंकरा ।।२।।
गगनाभेदी तुझे शिखर । पाहता पाप ताप हर ।
सन्मुखी उभा नंदीश्वर । भीमाशंकरा ।।३।।
एक आरती तुजला राया । शोकनाशक शिवराया ।
भाकीतो शंभु गौरीवरा । भीमाशंकरा ।।४।।
भूकैलास खरोखर । कमलजादेवी अवतार ।
करीतो प्रभू नमस्कार । भीमाशंकरा ।।५।।

आरती वीरभद्राची

आरती वीरभद्रा । शिवप्रिया महारुद्रा ।।धृ।।
प्रतापी तु रुद्र थोर । काळाप्रती दंडणार ।
दुष्टांचा रे संहार । करीसी भक्तांचे माहेर ।।१।।
दक्षे शिवनिंदा केली । त्यासी शिक्षा त्वा लाविली ।
तोषविला चंद्रमौळी । श्रेष्ठ ताता तू रे बळी ।।२।।
दक्षमख विध्वंसुन । देव केले अति दीन ।
भक्तांचा तू सखा पूर्ण । भक्तां रक्षिसी धावून ।।३।।
ब्रह्मांड हे उचलून । नेशी प्रतापी तू पूर्ण ।
शिवभक्त दयाघन । आहेसी तू शिवनंदन ।।४।।
शिवापासी निरंतर । वससी रे निर्घोर ।
लक्ष्मण हा किंकर । तुमचा म्हणवितो पामर ।।५।।

पद

त्या प्रिय शंकराला । जीव पाहण्या भुकेला ।
कैलासीच्या शिवाला । कुणी भेटवा आम्हाला ।। धृ ।।
नरमुंड माळधारी । विष सर्प ते शरीरी ।
अवधूत वेषवाला । जीव पाहण्या भुकेला ।। १ ।।
व्याघ्रासनी विराजे । लल्लाटी चंद्र साजे ।
डमरु त्रिशुळवाला । जीव पाहण्या भुकेला ।। २ ।।
शोभे जटेत गंगा । पीऊनी राहे भंगा ।
अलमस्त बैलवाला । जीव पाहण्या भुकेला ।। ३ ।।
नाचे पिशाच्च संगे । जो भिल्लीणीशी रंगे ।
वश होय भाविकांला । जीव पाहण्या भुकेला ।। ४ ।।
करी शंख नाद रुंजे । मुखी सोहं सोहं गुंजे ।
क्षणी जाळिले मदाला । जीव पाहण्या भुकेला ।। ५ ।।
तुकड्या तयास ध्यायी । ध्यानी दिसो सदाही ।
हा हेत पुरविण्याला । जीव पाहण्या भुकेला ।। ६ ।।

भजन

भज मन शंकर सदाशिवा । पार्वती वल्लभ उमाधवा ।।धृ.।।
निजमन मंदिरी ध्याऊ या । चरण तयाचे सेवु या ।
सुंदर रुप पाहु या । गुण तयाचे गाऊ या ।
भावपुष्प हे महादेवा । पार्वती वल्लभ उमाधवा ।।१।।
शेष जयाचे गीत गाता । विष्णु जयाशी नेत्र वाहता ।
लंकाधिश जो शीर छेदीता । ऐशा परि या निजभक्ता ।
करी आपली परमसेवा । पार्वती वल्लभ उमाधवा ।।२।।
आठविता जरी परमपदा । जवळी राहीन मोक्ष सदा ।
स्वानंदी या नेई जीवा । पार्वती वल्लभ उमाधवा ।।३।।

।। श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी स्तोत्र ।।

बालागिरीचा शिवराज योगी । जागा असोनी शिवधर्म सांगी ।
भागीरथी संगम मोदकारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१।।
गंगा वाहते झुळझुळ नामी । पद्मासनी हा गुरुराज स्वामी ।
वैराग्यमुर्ती जलभस्मधारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।२।।
संवत्सरी दुंदुभी माघ मासी । शुक्ली वसंती भर पंचमीसी ।
निन्नूर गावी सूजना दुपारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।३।।
झाली पहा बंद कुटील निंदा । ब्यांशी पहिले शतके हि चौदा ।
ओलांडुनी जन्म सु सोमवारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।४।।
प्रसिध्द भूमी कपिलापुरी ही । ग्रंथांतरी पुण्य विशेष पाही ।
निसर्गशोभा रमणीय सारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।५।।
येथे पहा सर्व समाज मेळा । यात्रा भरे मन्मथ पौर्णिमेला ।
आणि असे श्रावण सोमवारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।६।।
सारी प्रथा ही शिवसांप्रदायी । नारी नरांना भजनांत घेई ।
पायी करावी दर मास वारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।७।।
व्याघ्रासनी बैठक मन्मथाची । प्रसन्न मुद्रा वर योगीयाची ।
पक्षी तसे कीटक ना विषारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।८।।
काष्टौषधी निर्मळ शुध्द पाणी । प्रेमामृते ऐका अभंगवाणी ।
साक्षात परमात्मा गुरुरुपधारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।९।।
धारा पडावी शिरी पंचकुंडी । दीनोद्धाराची बहु गोड जोडी ।
व्याघ्रासनें सर्प सदा विहारी । मला मन्मथा निज तूच तरी ।।१०।।
लिंगांगी धर्म सुजागृत केला । संजीवनी त्या समाधी सुवेळा ।
रोमांचकारी घटना भरारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।११।।

जटा सुशोभे शिवयोगी यासी । ध्यानी पहावी गुरुमुर्ती खासी ।
पायी खडावा कटि कौपधारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१२।।
माथा नमीतो गुरुलिंग जंगमी । रुद्राक्ष भस्मे तव अर्चि सूक्ष्मी ।
तीर्थ प्रसादावर मंत्र तारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१३।।
भक्त महेश तरती प्रसादी । जे प्राणलिंगी शरणी नि ऐक्यी ।
त्या सज्जनांचा हर काम मारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१४।।
आचार तत्वे सदा आचरावी । आचार्य सांगे धर नेम जीवी ।
सौख्य सुखा दे सुजनास भारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१५।।
चिंता नसावी शिवपुत्रयासी । चित्ती असावी गुरुभक्ति रासी ।
प्रेमे भजावा कुल मोक्षकारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१६।।
गेले पुजोनी गुरुचे पदाला । संकल्प फेडे मनुजा फळाला ।
संसार सारा बहु तापकारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१७।।
अभंगवाणी करुनी प्रजेला । देई मराठी मधुनी उजाळा ।
साहित्य निर्मी महाब्रम्हचारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१८।।
शाहीर आले शरणांगता जे । दीक्षा तया देत नमो नमो जे ।
शिरोमणी स्थिति अंगिकारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।१९।।
संकेश्वराची सुमनेही साधी । चाफा नि बिल्वे बकुले सुगंधी ।
अर्पी सदा जो शिवलिंगधारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।२०।।
वारी प्रवाशी सकळा जनाला । साष्टांग माझा गुरु मन्मथाला ।
दुःखे परंडा गुरुची निवारी । मला मन्मथा निज तूच तारी ।।२१।।
पापी असो वा व्यसनी असो । जे ईच्छा धरोनी भजनी रमे जे ।
म्हणे स्तोत्र जो हे सायंसकाळी । तया पातकांची होईल होळी ।।२२।।
श्री मज्जगद्‌गुरु पंचाचार्य महाराज की जय
संत शिरोमणी श्री मन्मथस्वामी महाराज की जय

पद

भोळ्या गिरीजा वराला । ध्या रे प्रिय शंकराला ।।धृ।।

व्याघ्रासन आसन कटी बांधी । सदा अखंडित राहे समाधी ।

अंगी भस्म लावलेला ।।१।। ध्या रे प्रिय शंकराला ।।

वाजत भं भं डमरु भेरी । नाचती भुते पिशाच्च सारी ।

भाळी चंद्र लावलेला ।।२।। ध्या रे प्रिय शंकराला ।।

नंदीस्वार अखंडीत राहे । झुळझुळ गंगा मस्तकी वाहे ।

शोभे नीळकंठ ज्याला ।।३।। ध्या रे प्रिय शंकराला ।।

मस्त सदा ध्यानी रत डोले । वदनी सोहं सोहं पद बोले ।

तुकड्या वंदितो पदाला ।।४।। ध्या रे प्रिय शंकराला ।।

भजनासंबंधी नियम

१. भजनास बसते वेळी वीण्याचे दर्शन घेऊनच भजनास बसावे.

२. भजनात वीणेकऱ्याने किंवा प्रमुख व्यक्तीने अभंग सांगीतल्या शिवाय मनाने म्हणू नये.

३. भजनासाठी येणाऱ्या व्यक्तीने पूर्ण भजन आरती होई पर्यंत बसावे मध्येच उठून जाऊ नये.


४. भजनासाठी बाहेरगावी जावयाचे असल्यास इतर कोणत्याही सदस्या जवळ निरोप माहिती मिळाल्यावर अध्यक्षाजवळ सांगावे व अध्यक्षाने सर्व भजनी मंडळास कळवावे व सर्वानुमते भजन घ्यावे व जाण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा.

५. अभंगाचा मान बाहेरगावच्या किंवा ईतर व्यक्तिस द्यावा.

६. वेळेवर भजन संपल्यावर कोणी अभंगा शिवाय राहिलेतर त्या व्यक्तिस दुसरे वेळेस अभंग अगोदर दिले जाईल खंत बाळगू नये.

७. भजनास वेळेवर यावे वेळेवर जावे त्याचा आनंद सर्वांना मिळतो

८. भजन हे करमणुकीचे साधन नाही व भक्तीचा मळा सर्वांसाठी आहे.







श्री वैद्यनाथ शिवसांप्रदायीक भजनी पध्दती विषयी मनोगत

भारतामध्ये प्रसिध्द असलेल्या वारा ज्योतिर्लिंगापैकी श्री क्षेत्र परळी वैजनाथ हे पाचवे ज्योतिर्लिंग आहे. या श्री वैद्यनाथ मंदीरात प्रत्येक सोमवारी रात्री ९.३० ते १.३० वाजेपर्यंत शिवभजन, वैद्यनाथ प्रभुची पालखीची (छबीना) परंपरा अनेक वर्षापासून चालू आहे. त्यावेळी वैद्यनाथ प्रभुची पालखी मंदीरातल्या मंदीरात निघत असते.

ही परंपरा चालू ठेवण्यासाठी तीन ते पाच पिढ्यापासून भजनी मंडळातील खालील व्यक्तीनीं खूप परिश्रम घेतले. त्या मध्ये तिसऱ्या पिढीतील खालील व्यक्ती आहेत.

कै. श्री वसलिंगअप्पा चौधरी, कै. श्री पांडूरंगअप्पा कोरे, कै. श्री नारायणराव कोडी, कै. श्री वैजनाथअप्पा गोडाळे, कै. श्री धोंडीअप्पा मेनकुदळे, कै. श्री वैजनाथअप्पा मोगरकर, कै. श्री सदाशिवअप्पा हालगे, कै. श्री शंकरअप्पा बुरकूले, कै. श्री वैजनाथअप्पा काटकर, कै. श्री पारलिंग स्वामी, कै. श्री नरहरीअप्पा साखरे, कै. श्री सांवप्पा चौधरी, कै. श्री मारुतीअप्पा हालगे, कै. श्री सांवप्पा खोत, कै. श्री शंकरअप्पा सपाटे, कै. श्री वीरभद्रअप्पा राजनाळे कै. श्री नागोबाअप्पा सुगरे, कै. श्री नारायणराव चनेवार, कै. श्री वसंतराव सोनार, कै. श्री महारुद्रअप्पा चौंडे, इत्यादीचां समावेश आहे.

त्या नंतरच्या चौथ्या पिढीतील कै. श्री मन्मथअप्पा कापसे, कै. श्री खंडूअप्पा खोत, कै. श्री वैजनाथअप्पा बुरकुले, कै. श्री मल्लिकार्जुनअप्पा बुरकुले, कै. श्री मल्लिकार्जुनअप्पा घनचेकर, कै. श्री काशिनाथअप्पा घनचेकर, कै. श्री गणपत (दादा) साखरे, कै. सौ. रत्नाबाई चौधरी, कै. श्रीमती गंगाबाई चौधरी, कै.श्रीमती गिरीजाबाई चौधरी, कै. श्रीमती त्रिवेनीबाई स्वामी, कै. श्रीमती भागीरथीबाई गोडाळे, कै. श्रीमती सुंदराबाई गौरशेटे यांनी ही परंपरा पुढे चालविली.

पाचव्या पिढीमध्ये श्री विश्वनाथ स्वामी, श्री वैजनाथ कोरे, सौ. गोदावरीताई चौधरी, सौ. सरुबाई रेवडकर, श्रीमती लक्ष्मीबाई प्रभुअप्पा चौधरी, श्री सुरेश शिंदे, श्री सदाशिव सुगरे, श्री दयानंद चौधरी, श्री लक्ष्मणअप्पा बुद्रे, श्री शिवहरअप्पा बोटूले, श्री रमेश फुलारी, श्री रामभाऊ हरंगुळे, श्री विश्वंभर साखरे, श्री रामकिशन साखरे, श्री मन्मथ ओपळे, श्री भास्करराव कोटूळे, सौ. अन्नपूर्णाबाई निर्मळे, सौ. सुक्ष्मताई निर्मळे, सौ.शिवकन्या निर्मळे, सौ. अन्नपूर्णा नरवणे, श्रीमती मंगलताई गुळवे,श्री भिमाशंकरअप्पा चौधरी, व इतर अनेक मंडळीनी ही छबीन्याची परंपरा पुढे चालू ठेवली आहे.

तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या पिढीचे साक्षीदार श्री नागनाथअप्पा वाघमारे हे आहेत.

यानंतर नवतरुण मंडळीनी सहभाग घेऊन ही परंपरा अखंड चालू ठेवावी एवढीच वैद्यनाथ प्रभु चरणी प्रार्थना.

संत चरणांचा सेवक

श्री नागनाथ उमाशंकरअप्पा वाघमारे

परळी वैजनाथ.

